
MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.
# दिशा

वर्ष एकविसावे/अंक ६/जून २०२०



## संपादकीय

### युरोपमधील पहिले आणि दुसरे प्रबोधनयुग आणि संस्कृत भाषा

Renaissance म्हणजे प्रबोधन युग. या युगाला युरोपमध्ये चौदाव्या व पंधराव्या शतकात सुरुवात झाली.

पाचव्या शतकात रोमन साम्राज्याचा पाडाव झाला. तेव्हापासून ते पंधराव्या शतकापर्यंतचा काळ हा सर्वसाधारणपणे मध्ययुगीन काळ मानला जातो. युरोपमध्ये या काळामध्ये कुठल्याच क्षेत्रात फारशी प्रगती न झाल्यामुळे त्याला 'अंधारयुग'ही म्हटले जाते.

प्टोलेमी (Ptolemy - १०० ते १७०) आणि बायबल यांच्या मताप्रमाणे सर्व विश्व हे 'पृथ्वीकेंद्रित' (Geocentric) होते. सर्वसाधारणपणे सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धात कोपर्निकसने (Copernicus - १४७३ ते १५४३) 'सूर्यकेंद्रित' (Heliocentric) सिद्धांत मांडून या प्रबोधनयुगाला सुरुवात झाली. कोपर्निकस पाठोपाठ गॅलिलिओ (Galileo, १५६४ ते १६४२), केपलर (Kepler, १५७१ ते १६३०), न्यूटन (Newton, १६४३ ते १७२७), डार्विन (Charles Darwin, १८०९ ते १८८२) ते अगदी आइन्स्टाइन (Albert Einstein, १८७९ ते १९५५) पर्यंत शेकडो शास्त्रज्ञांनी ही विज्ञान प्रबोधनाची प्रक्रिया पुढे चालूच ठेवली.

सोळाव्या शतकात सुरू झालेल्या या प्रबोधनाचा पुढचा टप्पा होता वैज्ञानिक क्रांतीचा, आणि त्यापाठोपाठ आलेल्या औद्योगिक क्रांतीचा. अर्थात यात सर्वात महत्त्वाचे शोध हे एकोणिसाव्या शतकात लागले. विमान, आगगाडी, मोटारींपासून ते विजेच्या उपकरणांपर्यंत भौतिक जगातील आजच्या या सगळ्या वस्तूंचा उगम हा बहुतेक एकोणिसाव्या शतकातील आहे.

प्रबोधन युगामध्ये जशी वैज्ञानिक क्षेत्रांमध्ये प्रगती होत गेली; तशीच कला, साहित्य आणि तत्त्वज्ञान या क्षेत्रांमध्येही क्रांतिकारक बदल होत गेले. थोडक्यात, मानवाच्या अस्तित्वाकरिता लागणाऱ्या सगळ्या संकल्पना या प्रबोधन युगात बदलल्या, आणि त्यातून अनेक नवीन संकल्पनांचा जन्मही झाला.

युरोपमध्ये अंधारयुगामध्ये खुंटलेल्या प्रगतीची कारणमीमांसा या प्रबोधनयुगाच्या आधी व्हायला लागली. हा

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

काळ युरोपमधील अंधारयुग असला, तरी इराण, इराक आणि इस्लामी जगामध्ये तो भरभराटीचा आणि प्रबोधनाचा काळ होता. जगातल्या अनेक विज्ञान आणि तत्त्वज्ञान ग्रंथांचे भाषांतर अरेबियन आणि पर्शियन भाषेत होत होते. पाचव्या-सहाव्या शतकांत इराणमधील गुंडीशापूर, आठव्या-दहाव्या शतकांमध्ये इराकमधील बगदाद, आणि बाराव्या-तेराव्या शतकात स्पेनमधील टोलीडो (Toledo) येथे ग्रीक भाषेत लिहिलेल्या ख्रिस्तपूर्व आणि नंतरच्या विज्ञान, तत्त्वज्ञान आणि कलाग्रंथांचे भाषांतर होत होते. याच वेळेस हिंदूंचे गणित, व्याकरण आणि वैद्यकशास्त्राचेही अनेक ग्रंथ संस्कृतमधून भाषांतरित होत होते. बाराव्या-तेराव्या शतकात या भाषांतरित अरेबियन आणि पर्शियन ग्रंथांची लॅटिनमध्ये भाषांतरे व्हायला लागली. भारतामध्ये संस्कृत, इस्लामी जगतात अरेबिक, तसेच युरोपमधील विज्ञानाची भाषा ही अगदी अठराव्या शतकापर्यंत लॅटीन होती.

युरोपमधील अभ्यासकांना, लॅटिनमध्ये भाषांतरित होत असलेले अनेक वैज्ञानिक अरबी ग्रंथ, हे मूळ ग्रीक ग्रंथांचे भाषांतर आहे हे लक्षात यायला लागले. त्यावेळी युरोपमध्ये ग्रीक भाषा ही बहुतेक विस्मृतीत गेली होती. म्हणूनच ग्रीक भाषा आणि सभ्यता, आपली मूळ संस्कृती असल्यामुळे त्यांचे पुनरुत्थान करण्याची प्रक्रिया युरोपमध्ये चालू झाली. सदर प्रक्रिया हीच प्रबोधन युगाची सुरुवात होती, की ज्यामुळे पुढच्या वैज्ञानिक आणि वैचारिक क्रांत्या युरोपमध्ये झाल्या.

युरोपमधील दुसरे प्रबोधन युग हे खऱ्या अर्थाने एकोणिसाव्या शतकातच चालू झाले. पहिल्या प्रबोधनयुगाला (१४ ते १८ वे शतक) ग्रीक आणि लॅटीन भाषांमधील तत्त्वज्ञान, कला आणि विज्ञानग्रंथ कारणीभूत होते. दुसऱ्या प्रबोधनाला संस्कृत ग्रंथातील ज्ञानभांडार कारणीभूत झाले. कुठल्याही संस्कृतीच्या विचारांचे गुणात्मक मूल्यमापन हे त्या सभ्यतांमध्ये असलेल्या गणित आणि भाषा, म्हणजे भाषेचे व्याकरण या विषयांच्या विकासावरून होते. संस्कृतमधील या दोन विषयांच्या ग्रंथांनीच भारतीय सभ्यतेची उंची आणि खोली पाश्चात्यांना समजू लागली. अर्थातच तुलना करायला या विषयांचे ग्रीक साहित्य होतेच.

गणिताच्या संदर्भात संस्कृत मधील गणित ग्रंथांची सुरुवातीची माहिती ही प्रामुख्याने खालील इटालियन आणि फ्रेंच अभ्यासकांनी त्यांना करून दिली.

जिओवाणी कॅसिनी (Giovanni Domenico Cassini, १६२५ ते १७१२) हा इटालियन असला तरी त्याची महत्त्वाची कारकीर्द ही पॅरिसमधील वेधशाळेमध्ये व्यतीत झाली. चौदाव्या लुईच्या एका राजदूताने सयाम होऊन ग्रहगणिताची काही संस्कृत हस्तलिखिते १६८७ ला पॅरिसमध्ये आणली होती. कॅसिनीने त्याचा अभ्यास करून आपले निष्कर्ष Memoirus de Academic Royale des science या निबंधातून प्रकाशित केले. हिंदूंचे ग्रहगणित आणि ज्योतिष या विषयावर गांभीर्याने संशोधनाची सुरुवात ही कॅसिनी यांच्या लेखांमुळे झाली असं म्हटलं तर ते गैर होणार नाही.

ल जेंटील (Le Gentil, १७२५ ते १७९२) हे फ्रेंच गणिती १७६९ साली भारतामध्ये ग्रहगणिताचा अभ्यास करण्याकरिता आले होते. दक्षिण भारतामधील त्यांच्या या वास्तव्यामध्ये त्यांनी अनेक ज्योतिषांशी चर्चा केल्या, आणि हिंदूंचे

(पृष्ठ क्र. ३८ वर)

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.

# दिशा

## वर्ष एकविसावे/अंक ६/जून २०२०



**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २४ वे/अंक १२ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**


## *अनुक्रमणिका*


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | ॲलन टुरिंग | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | महाराष्ट्रावरील ब्रिटीश राजवटीची सुरुवात | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | ५ |
| ४) | आषाढस्य प्रथम दिवसे : महाकवी कालिदास दिनानिमित्ताने | डॉ. प्रशांत धर्माधिकारी | १४ |
| ५) | चला मालवणाक ... | श्री. स्वप्नील नंदकुमार मयेकर | १७ |
| ६) | बांडगुळे / लोरांथस | श्री. प्रकाश दुधाळकर | २१ |
| ७) | क्योंकी...अपना टाइम आयेगा!! | डॉ. सौ. अर्चना केदार प्रभुदेसाई | २३ |
| ८) | तीन दिवस ४५० किलोमीटर अंतर : एक समृद्ध करणारा सायकल सफरीचा अनुभव | प्रा. नारायण बारसे | २६ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | ३० |



या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- ❖ आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- ❖ हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- ❖ शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- ❖ आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- ❖ आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- ❖ आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- ❖ दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- ❖ आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- ❖ www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- ❖ वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- ❖ कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# ॲलन टुरिंग

*पहिली संगणक बनविणारी व्यक्ती म्हणून ॲलन टुरिंग यांचे नाव घेतले जाते. जून महिन्यातच त्यांची जयंती तसेच पुण्यतिथी येते. त्या निमित्ताने ॲलन टुरिंगची माहिती देणारा हा लेख - संपादक*

ॲलन टुरिंग (Alan Turing) हे एक ब्रिटिश गणितज्ज्ञ होते. त्यांचे वडील बिहार प्रांतात आय सी एस अधिकारी होते. त्यांची आई मद्रास रेल्वे विभागात असलेल्या अधिकाऱ्यांची मुलगी होती. आपल्या मुलाची जोपासना भारताऐवजी इंग्लंडमध्ये व्हावी या उद्देशाने त्याच्या वडिलांनी गरोदर असलेल्या आपल्या पत्नीला (म्हणजे ॲलनच्या आईला) इंग्लंडला पाठवून दिले. २३ जून १९१२ रोजी लंडनमध्ये त्यांचा जन्म झाला. लंडनमधील एका खाजगी शाळेत त्याने आपले शालेय शिक्षण पूर्ण केले आणि १९३१ मध्ये केंब्रिज विद्यापीठातील किंग्ज कॉलेजमध्ये (King's College, Cambridge) प्रवेश घेतला. तीन वर्षांत पदवीचे शिक्षण पूर्ण करून पुढील शिक्षणासाठी तो अमेरिकेतील प्रिन्स्टन विद्यापीठात (Princeton University) गेला. तिथे प्राध्यापक ॲलोंझो चर्च (Alonzo Church) यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन करून त्याने प्रिन्स्टन विद्यापीठाची पीएच. डी. मिळविली. त्यानंतर तो केंब्रिजला परत आला आणि किंग्ज कॉलेज मध्ये संशोधन करू लागला.

१९३० या दशकाच्या उत्तरार्धात दुसरे महायुद्ध सुरू झाले. चौथ्या दशकात त्या युद्धाने अक्राळविक्राळ रूप धारण केले. हिटलरचे सैन्य अख्ख्या युरोपात धुमाकूळ घालत होते. युरोपातील अनेक देशांवर जर्मन्यांचे राज्य प्रस्थापित झाले. जर्मन सैन्य लंडनवर बाँब वर्षाव करीत होते. त्यावर आळा घालणे आवश्यक होते. हिटलरच्या युद्ध-नीतीला जशास तसे उत्तर देण्याची योजना ब्लेचली पार्क (Bletchley Park) येथील गुप्त कार्यालयात आखली जात होती. या कामात मदत करण्यासाठी १९३९ मध्ये ॲलन टुरिंगला ब्लेचली पार्कला पाचारण करण्यात आले.

१९३९ पासून युद्ध संपेपर्यंत ॲलन टुरिंग हे ब्लेचली पार्कच्या युद्ध कालीन गुप्त कार्यालयात काम करीत होते. ब्लेचली हे गाव इंग्लंड मधील लंडन आणि बर्मिंगहॅम या दोन मोठ्या शहरांच्या मधोमध वसले आहे. या गावात एका श्रीमंत माणसाचा एक महाल होता. हा महाल आणि त्याच्या अवतीभोवती असलेली जागा युद्धकाळात सरकारने ताब्यात घेऊन तेथे युद्ध कालीन गुप्त कार्यालय (Wartime Secret Office) सुरू केले. युद्धानंतर त्या परिसरात मिल्टन कीन्स (Milton Keynes) नावाचे शहर वसवले गेले. ब्लेचली हे गाव आता त्या शहराचा एक भाग आहे. मिल्टन कीन्स शहरात जगातील पहिले 'मुक्त विद्यापीठ' (Open University) स्थापन करण्यात आले आहे. या विद्यापीठात संशोधक म्हणून काम करण्याची मला संधी मिळाली. त्या निमित्ताने मी एक वर्षभर मिल्टन कीन्स शहरात राहत होतो. त्या अवधित संधी साधून मी ब्लेचली पार्कला भेट द्यायला गेलो. तेव्हा मला फारच मनोरंजक माहिती मिळाली.


गुप्त कार्यालयात काम करणाऱ्या लोकांची संख्या बरीच असल्याने त्यांना एक महाल पुरणे शक्य नव्हते. म्हणून गरजेनुसार त्यांनी लहान लहान झोपड्या (Huts) बांधून घेतल्या. त्यातील आठ क्रमांकाच्या झोपडीत



**कामाच्या सोयीसाठी बांधलेल्या तिथल्या झोपड्या!**


ॲलन टुरिंग काम करीत असत. हिटलरच्या आदेशाचा अर्थ लावण्याची मोठी जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली होती. हिटलर एका ठिकाणी राहून वेगवेगळ्या ठिकाणी असलेल्या त्यांच्या सेनाधिकाऱ्यांना त्यांनाच समजेल अशा भाषेत आदेश देत असत. हे आदेश रेडिओ किरणांच्या मदतीने त्यांच्यापर्यंत पोहोचविले जात असत. ब्लेचली येथील कार्यालयाने रेडिओ संदेशाची नोंद ठेवण्यासाठी माणसे नेमली होती. ते सगळे जण आपापल्या नोंदी कार्यालयात आणून देत असत. त्यांचे विश्लेषण करून त्यातून अर्थ काढण्याची जबाबदारी ॲलन टुरिंगवर होती. त्यासाठी त्याने एक यंत्र बनविले. त्या वेळेस त्या यंत्राला 'बोंबे' (Bombe) असे संबोधले जात असे. हे यंत्र नेमके कसे होते ते मला पहायचे होते. तिथे असलेल्या माणसाने असे सांगितले की, मूळचे यंत्र जाळून टाकण्यात आले. तथापि काही वर्षांपूर्वी तेथे काम करणाऱ्या लोकांच्या मदतीने एक प्रतिकृती बनवून ठेवण्यात आली आहे. त्याचे चित्र पुढे दिले आहे.

युद्ध समाप्त झाल्यावर ॲलन टुरिंग लंडनच्या राष्ट्रीय भौतिक प्रयोगशाळेत (National Physical Laboratory) रुजू झाला. तिथे त्यांनी संगणक



**बोंबेची प्रतिकृती**

बनविण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर तो मँचेस्टर विद्यापीठात काम करायला गेला. तेथे देखील त्याने संगणकासंबंधी मोलाचे कार्य केले. जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत तो संशोधनकार्यच करीत होता. अशाच एका प्रयोगात सायनाईड लागलेले सफरचंद खाल्ल्याने ७ जून १९५४ रोजी तो जग सोडून गेला. एवढा कर्तबगार माणूस केवळ ४२ व्या वर्षी विचित्रपणे जग सोडून गेला याचा विज्ञान जगतातील लोकांना धक्का बसला. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मँचेस्टर विद्यापीठात त्यांचे स्मारक उभारण्यात आले आहे.




**ॲलन टुरिंगचे स्मारक**

(पृष्ठ क्र.२० वर)

# महाराष्ट्रावरील ब्रिटिश राजवटीची सुरुवात

*१९ व्या शतकात ब्रिटिशांच्या राजवटीस सुरुवात होण्याच्या पूर्वसंध्येला महाराष्ट्रात असलेली सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय स्थिती विशद करणारा लेख- संपादक*

**प्रस्तावना**

महाराष्ट्राचा इतिहास फार प्राचीन आहे. प्राचीन काळात महाराष्ट्रावर सातवाहन, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकूट, शिलाहार आदी प्रसिद्ध राजघराण्यांनी राज्य केले. या राजघराण्यांनी महाराष्ट्राला अनेक महान राजे दिले. यातील काही महत्त्वाचे राजे पुढीलप्रमाणे आहेत– गौतमीपुत्र सातकर्णी (सातवाहन), हाल (या सातवाहन कुलातील राजाला महाराष्ट्री प्राकृतातील 'गाथासप्तशती' (वा 'गाथासत्तसई') या ग्रंथाचे संकलन करण्याचे श्रेय जाते. महाराष्ट्री प्राकृतातून आधुनिक मराठी भाषा उगम पावली असे तज्ज्ञांचे मत आहे. त्यामुळे, 'सातवाहन हाल राजा मराठीतील पहिला ज्ञात लेखक होय' असे म्हणणे वावगे ठरू नये.), दुसरा प्रवरसेन (या वाकाटक राजघराण्यातील राजाने महाराष्ट्री प्राकृतात 'सेतुबंध' (वा 'रावणहो') हा पद्यग्रंथ रचला), सर्वसेन (हादेखील वाकाटक कुलातील राजा होता व याने महाराष्ट्री प्राकृतात 'हरिविजय' या पद्यग्रंथाची निर्मिती केली.), दुसरा पुलकेशी (हा चालुक्य घराण्यातील शूर राजा होता. याने त्याचा उत्तर भारतातील समकालीन प्रसिद्ध राजा हर्षवर्धन याचा पराभव केला होता.), पहिला अपरादित्य (हा शिलाहार राजघराण्यातील राजा होता. या राजघराण्याचे प्राचीन काळात ठाण्यासह उत्तर कोकणावर राज्य होते. पहिल्या अपरादित्याला संगीत या विषयात रुची होती. तसेच त्याने याज्ञवल्क्य स्मृतीवर टीका लिहिली होती. ही टीका 'अपरारक' या नावाने प्रसिद्ध आहे.)

मध्ययुगीन काळात महाराष्ट्रावर राज्य करणारे महत्त्वाचे राजघराणे म्हणजे यादव राजघराणे होय. देवगिरी (सध्याच्या महाराष्ट्रातील औरंगाबाद जिल्हा) ही त्यांची राजधानी होती. याच देवगिरीच्या यादवांच्या काळात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी आपली भगवद्‌गीते वरील मराठीतील टीका १२९० च्या आसपास लिहिली होती व ती 'ज्ञानेश्वरी' या नावाने प्रसिद्ध आहे. रामदेवराय या यादव राजाच्या कारकीर्दीत अल्लाउद्दीन खिलजीने देवगिरीवर हल्ला केला होता व तो येथून मोठी लूट घेऊन उत्तरेत परतला होता. या लुटीच्या बळावरच अल्लाउद्दीन खिलजी आपला चुलता व सासरा जलालुद्दीन खिलजी याची हत्या करून दिल्लीचे तखत काबीज करू शकला. देवगिरीचे यादव आपला संबंध पौराणिक 'यदू' वंशाशी लावत असत. हिंदू धर्मियांमध्ये अशी मान्यता वा श्रद्धा आहे की, भगवान श्रीकृष्ण हे 'यदू' वंशातील होते.

मध्ययुगीन काळात कालांतराने महाराष्ट्राचा बराचसा भाग दिल्लीच्या सुलतानांच्या (दिल्लीची सुलतानशाही) व मुघलांच्या नियंत्रणाखाली गेला. १७ व्या शतकाच्या मध्यात छत्रपती शिवाजी महाराजांनी विजापूरची आदिलशाही, तत्कालीन इतर मुस्लीम शासक, तसेच मुघलांच्या विरुद्ध लढून महाराष्ट्रात 'स्वराज्याची' स्थापना केली. छत्रपती शिवरायांनी मराठ्यांचे म्हणजेच मराठी माणसांचे स्वराज्य स्थापन करून येथील जनतेचे मनोबल व आत्मविश्वास वाढविण्याचे काम केले. शिवराय हे खऱ्या अर्थाने जनसामान्यांचे व कष्टकरी जनतेचे राजे होते. त्यामुळेच त्यांना 'रयतेचा राजा' असे देखील म्हटले जाते. छत्रपती शिवाजी महाराजांना स्त्रियांविषयी

नितांत आदर होता. तसेच ते विद्वानांचा यथायोग्य सन्मान करत असत.

छत्रपती शिवाजी महाराजांचा इसवीसन १६८० मध्ये मृत्यू झाला. शिवरायांनंतर छत्रपती संभाजी महाराज हे मराठ्यांच्या गादीवर आले. संभाजी महाराजांनंतर राजाराम व राणी ताराबाई यांनी मराठ्यांच्या राज्याची (वा स्वराज्याची) धुरा समर्थपणे सांभाळली व मुघलांविरुद्धचा राजकीय लढा निकराने चालू ठेवला. छत्रपती संभाजी महाराजांनी स्वराज्यासाठी आपल्या जीवाचा केलेला त्याग महाराष्ट्रातील जनता विसरू शकली नाही. उलट त्यामुळे स्वराज्यातील प्रत्येक घटक चवताळून उठला व मराठी मुलखाने बलाढ्य मुघल बादशहा औरंगजेब याला मराठी मातीत गुडघे टेकायला लावले. राणी ताराबाईंनी छत्रपती राजाराम महाराजांच्या मृत्यूपश्चातदेखील मराठी लढवय्या वीरांना कुशल नेतृत्व दिले व औरंगजेबाचे मराठ्यांचे स्वराज्य जिंकण्याचे स्वप्न शेवटपर्यंत पूर्ण होऊ दिले नाही. शेवटी १७०७ साली औरंगजेबाचा महाराष्ट्रात मृत्यू झाला, परंतु तो महाराष्ट्र जिंकू शकला नाही.

१८व्या शतकाच्या सुरुवातीपासून महाराष्ट्राच्या राजकीय व्यवस्थेतील पेशव्यांचे स्थान बळकट होण्यास प्रारंभ झाला. पेशवे म्हणजे मराठा स्वराज्याचे प्रधानमंत्री. सातारच्या गादीचे छत्रपती शाहू महाराज (छत्रपती संभाजी महाराजांचे सुपूत्र) यांनी बाळाजी विश्वनाथांना आपला पेशवा म्हणून नियुक्त केले. बाळाजी विश्वनाथ एक कर्तबगार व मुत्सद्दी प्रशासक होते. त्यांच्या पश्चात छत्रपती शाहूंनी बाळाजींचे सुपूत्र थोरले बाजीराव यांना १७२० मध्ये पेशवा म्हणून नेमले. अशा तऱ्हेने बाळाजी विश्वनाथांनंतर पेशवा हे पद वंशपरंपरागत बनले. थोरले बाजीराव ऊर्फ 'राऊ' हे इतिहासात पराक्रमी योद्धे म्हणून प्रसिद्ध आहेत. पेशवे बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे व थोरले माधवराव यांच्या काळातदेखील मराठी सत्तेचा उत्कर्ष झाला. अर्थात बाळाजी बाजीरावांच्या काळात तिसऱ्या पानिपतच्या लढाईमुळे (१७६१) मराठेशाहीला एक धक्का बसला. परंतु हा धक्का तात्पुरत्या स्वरूपाचा होता. थोरल्या माधवरावांच्या कारकीर्दीत पुन्हा एकदा मराठा सरदारांनी भारतभर आपला दबदबा प्रस्थापित केला. या मराठा सरदारांमध्ये बडोद्याचे गायकवाड, इंदौरचे होळकर, ग्वाल्हेरचे शिंदे, नागपूरचे भोसले व झाशीचे नेवाळकर यांचा प्रामुख्याने समावेश होता. साधारणतः पेशव्यांच्या मार्गदर्शनाखाली हे सरदार भारतभर मराठ्यांचे नाव प्रकाशमान करत होते व पराक्रम गाजवत होते. पेशव्यांची राजधानी पुण्यातील शनिवार वाड्यात होती. रघुनाथरावाचा पुत्र दुसरा बाजीराव हा मराठ्यांचा शेवटचा पेशवा ठरला. कारण त्याचा ब्रिटिशांनी तिसऱ्या आंग्ल-मराठा युद्धात (१८१७-१८) पराभव केला व त्यानंतर खऱ्या अर्थाने महाराष्ट्रात ब्रिटिशांचे राज्य सुरू झाले.

## सामाजिक स्थिती

१९व्या शतकात जेव्हा महाराष्ट्रावर ब्रिटिशांचे राज्य सुरू झाले तेव्हा येथील समाजात जातीव्यवस्था अस्तित्वात होती. समाजात अनेक जाती होत्या. समाजातील खालच्या स्तरातील जातीतील लोकांची स्थिती शोचनीय होती. अस्पृश्यांची परिस्थिती तर फार दयनीय होती. त्यांना सामाजिक, धार्मिक व आर्थिक समानता नाकारलेली होती. तसेच, त्यांचा स्पर्श वर्ज्य मानला जात असे.

समाजावर भक्ती-संप्रदायाचा देखील पगडा होता. लोक भक्ती-संप्रदायातील संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम आदी संतांच्या रचनांचे पारायण करत असत. विविध जातींतील 'बलुतेदार' वेगवेगळ्या स्वरूपाची कामे करत असत. समाजात ब्राह्मणांना उच्च दर्जा होता.

काही श्रीमंत घरातील व ब्राह्मण कुटुंबातील स्त्रियांना लिहिता व वाचता येत असले तरी स्त्रियांना शाळेत जाऊन रीतसर शिक्षण घेण्याची पद्धत नव्हती. त्यामुळे स्त्रियांमधील साक्षरतेचे प्रमाण कमी होते. समाजात 'देवदासी' व 'सती' सारख्या अनिष्ट प्रथा होत्या. तसेच बालविवाह होत असत; ज्याचा त्रास प्रामुख्याने स्त्रियांना होत असे.

समाजात संवादासाठी व लिहिण्यासाठी मराठी भाषेचा वापर होत असे. मराठी भाषा देवनागरी तसेच मोडी लिपीमध्ये लिहिली जाते असे. मराठी ही भारतीय उपखंडातील एक प्राचीन भाषा आहे. मराठी भाषेचा उगम महाराष्ट्री प्राकृत या भाषेतून झाला आहे. आपण पाहिलेच की, इसवीसनाच्या पहिल्या शतकात सातवाहन सम्राट हाल याने महाराष्ट्री प्राकृतात 'गाथासप्तशती' (वा 'गाथासत्तसई') हा ग्रंथ संकलित केला होता. मध्ययुगीन काळात महानुभाव व भक्ती-पंथातील संतांनी मराठी भाषेत दर्जेदार ग्रंथरचना करून मराठी भाषा समृद्ध केली.

**आर्थिक परिस्थिती**

अगोदर नमूद केल्याप्रमाणे विविध जातींतील 'बलुतेदार' लोहार, सोनार, सुतार, परीट, चांभार, न्हावी, कोळी, गावाची राखंदारी करणे इत्यादी स्वरूपाची कामे करत असत. अस्पृशांना अतिशय हीन स्वरूपाची कामे करावी लागत असत व त्यांना गावातील मंदिरांमध्ये प्रवेश नाकारण्यात येत असे. शेती ही समाजाच्या अर्थव्यवस्थेचा कणा होता. शेतीची कामे नसताना समाजातील लोक मराठा सैन्यात सैनिक म्हणून लढत असत.

शेतकऱ्यांकडून शेतसारा गोळा करण्यासाठी मराठेशाहीत जमिनीची तिच्या सुपीकतेनुसार वेगवेगळ्या श्रेणींमध्ये विभागणी करून कर आकारणी केली जात असे. निश्चितपणे ही चांगली पद्धत होती याद वाद नाही.

दुष्काळ वा इतर कारणांमुळे जर शेतकऱ्यांचे नुकसान झाले असेल तर मराठा शासक त्यांना शेतसाऱ्यातून सूट देत असत. तसेच अशा स्थितीत शेतकऱ्यांना 'तगाई' नामक कर्जाच्या स्वरूपात मदत दिली जाई. 'पाटील', 'कुलकर्णी', 'देशमुख' व 'देशपांडे' हे विविध स्तरावरील महसूल अधिकारी होते. अर्थमंत्र्यांना 'फडणीस' म्हणून संबोधले जात असे. दुष्काळी काळात शेतकऱ्यांना कर्ज देण्याची पद्धत खरोखरच वाखाणण्याजोगी होती.

पैठण, पुणे, ठाणे व कल्याण ही महत्त्वाची व्यापारी केंद्रे होती. पैठण हे शहर प्राचीनकाळी 'प्रतिष्ठान' या नावाने ओळखले जाई. गोदावरी नदीच्या तीरावरील हे शहर पूर्वीपासून विद्येचे माहेरघर म्हणून प्रसिद्ध होते. प्राचीन काळात प्रतिष्ठान ही सातवाहनांची राजधानी होती. पैठण ही संत एकनाथांची जन्मभूमी होती. संत एकनाथ हे संस्कृत व मराठीचे प्रकांड पंडित होते ही गोष्ट तर सर्वज्ञातच आहे. पेशव्यांच्या काळात राजधानीचे ठिकाण असल्यामुळे या काळात पुण्याचे महत्त्व मोठ्या प्रमाणात वाढले होते. ठाणे व कल्याण ही महत्त्वाची बंदरे होती व येथून परकीय व्यापार देखील चालत असे.

**प्रशासन व न्यायव्यवस्था**

महाराष्ट्रात ब्रिटिशांची राजवट सुरू झाल्यावर माऊंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन ह्या आंग्ल अधिकाऱ्याने सुरुवातीला डेक्कन कमिशनर (दख्खनचा आयुक्त) व नंतर गव्हर्नर (राज्यपाल) म्हणून काम पाहिले. एल्फिन्स्टनने महाराष्ट्रात पाश्चिमात्य स्वरूपाची प्रशासकीय व्यवस्था अंमलात आणली व ती मजबूत देखील केली. एल्फिन्स्टनने आंग्ल पद्धतीची प्रशासकीय यंत्रणा अंमलात आणून ती प्रबळ करून रुजवत असताना एत्तदेशीय चांगल्या तत्त्वांचादेखील स्वीकार केल्याचे निदर्शनास येते. नवीन प्रशासकीय बदल घडवून आणत असताना

एल्फिन्स्टनने एतद्देशीयांना (वा भारतीयांना) न दुखावण्याचा मार्ग स्वीकारला.

ब्रिटिश राजवटीत जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा एक महत्त्वाचा व प्रभावी अधिकारी बनला. जिल्हाधिकाऱ्याकडे जिल्हादंडाधिकारी पदाची देखील जबाबदारी देण्यात आली. त्यामुळे जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखणे हे सुद्धा त्याचे महत्त्वाचे काम बनले.

एल्फिन्स्टनच्या कारकीर्दीतील अतिशय महत्त्वाची उपलब्धी म्हणजे त्याच्या पुढाकाराने मुंबई इलाख्यासाठी बनवली गेलेली 'कायदे संहिता' ही होय. सदर कायदे संहिता 'एल्फिन्स्टन कोड' म्हणूनदेखील प्रसिद्ध आहे. ही कायदे संहिता बनविताना एल्फिन्स्टनने एतद्देशीय विद्वान ब्राह्मण पंडितांचीसुद्धा मदत घेतली होती.

माऊंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन हा एक उदारमतवादी प्रशासक होता. त्याचा जन्म ६ ऑक्टोबर १७७९ रोजी स्कॉटलंडमधील डनबार्टनशायर (Dunbartonshire) येथे झाला होता. त्याला ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने भारताचे गव्हर्नर-जनरलपद देऊ केले होते. मात्र ते त्याने नाकारले. एल्फिन्स्टनचा एतद्देशीय लोकांना मान व सन्मान देण्याच्या तत्त्वावर विश्वास होता. सरकारी शिक्षण व्यवस्थेची पद्धत रुजविण्यात त्याचा मोठा हातभार होता. त्याकाळी मुंबईतील काही भारतीय प्रसिद्ध व्यक्तींनी सार्वजनिक वर्गणी गोळा करून मुंबईत एक दर्जेदार उच्च शिक्षण देणारे महाविद्यालय सुरू केले व त्यास माऊंटस्टुअर्ट एल्फिन्स्टनच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'एलफिन्स्टन महाविद्यालय' हे नाव दिले. आजही एल्फिन्स्टन महाविद्यालय हे फक्त मुंबई वा महाराष्ट्रातीलच नव्हे, तर संपूर्ण भारतातील एक नावाजलेले व अग्रगण्य महाविद्यालय म्हणून ओळखले जाते.

ब्रिटिशांनी महाराष्ट्रात शिरूर, जुन्नर व पुणे येथे सैन्य तैनात ठेवले होते वा सैनिकी छावण्या उभारल्या होत्या. शिरूर व जुन्नर हे पुणे जिल्ह्यातील महत्त्वाचे तालुके होत. शिरूर हा तालुका पुण्याच्या पूर्व सीमेवर आहे, तर जुन्नर ईशान्येला आहे. ब्रिटिशांच्या शासनाच्या सुरुवातीच्या काळात हे दोन तालुके म्हणजे ब्रिटिशांच्या जुलमी व चुकीच्या धोरणांविरुद्धच्या उठावांचे केंद्रबिंदू होते. येथे एक मुद्दा नमूद करणे आवश्यक आहे व तो हा की, ब्रिटिशांनी भारतात पाश्चिमात्य पद्धतीवर आधारित नवीनतम शस्त्रास्त्रांनी सज्ज असे सैन्य वा लष्कर उभारले. त्यांनी सैनिकांना आधुनिक स्वरूपाचे प्रशिक्षण दिले व भारतीयांना देखील सैन्यात भरती करून घेतले. ब्रिटिश भारतीय सैनिकांना वा सैन्यातील शिपायांना अफगाणिस्तान व सिंधसारख्या दूरवरच्या प्रदेशांमध्ये लढण्यासाठी पाठवत असत.

सध्याच्या पश्चिम महाराष्ट्रातील व खानदेशातील बराचसा भाग हा त्यावेळच्या मुंबई इलाख्यात येत असे. तत्कालीन मुंबई इलाख्यात गुजरात, सिंध (सध्याच्या पाकिस्तानात), महाराष्ट्र (खानदेश व पश्चिम महाराष्ट्र) व कर्नाटकातील एकूण सव्वीस जिल्हे येत असत. मुंबई शहर ही मुंबई इलाख्याची राजधानी होती. कराची (सध्याचा पाकिस्तान), अहमदाबाद, पुणे व बेळगाव ही मुंबई इलाख्यातील इतर महत्त्वाची शहरे होती.

ब्रिटिशांनी मुंबई इलाख्यात पाश्चिमात्य पद्धतीवर आधारित नवीन न्यायव्यवस्थेची स्थापना केली. या न्यायव्यवस्थेत (वा प्रणालीत) जिल्हास्तरीय न्यायालयांना व प्रांत पातळीवरील उच्च न्यायालयांना फार महत्त्व होते. भारतात पाश्चिमात्य पद्धतीच्या न्यायव्यवस्थेचा खऱ्या अर्थाने पहिल्यांदा प्रारंभ करण्याचे श्रेय वॉरन हॅस्टिंग्ज याला जाते. नंतरच्या काळात लॉर्ड कॉर्नवॉलिस व लॉर्ड विल्यम बेंन्टिन्क यांना सदर प्रणाली (वा व्यवस्था) मजबूत करण्याचे श्रेय जाते. या नवीन न्यायप्रणालीत सर्वांना समान न्याय व कायदा हे तत्त्व

स्वीकारले गेले. १८६० साली भारतीय दंड संहिता बनविण्यात आली. ही भारतीय दंड संहिता बनविण्याचा मुख्य आधार म्हणजे १८३४ साली लॉर्ड थॉमस बेबिंग्टन मेकॉले यांच्या अध्यक्षतेखाली कायदा आयोगाने केलेल्या सूचना होत्या.

शेतसाऱ्याच्या बाबतीत आपण विचार केला तर ब्रिटिशांनी मुंबई इलाख्यात म्हणजेच महाराष्ट्रात शेतसारा (वा शेतीवरील महसूल) गोळा करण्यासाठी रयतवारी पद्धतीचा अवलंब केला. ही पद्धती मुळात थॉमस मन्रो या ब्रिटिश अधिकाऱ्याने मद्रास इलाख्यात सुरू केली होती. ह्याच शेतसारा पद्धतीचा अवलंब मुंबई इलाख्यात देखील करण्यात आला. रयतवारी शेतसारा पद्धतीत शेतजमीन जर कोरडवाहू प्रकारातील असेल, म्हणजेच जर शेती निव्वळ पावसाच्या पाण्यावर अवलंबून असेल तर ५०% एवढा शेतसारा आकारला जाई व शेती जर बागायती स्वरूपाची असेल म्हणजेच शेतीला पाणी उपलब्ध असेल व ती फक्त पावसाच्याच पाण्यावर अवलंबून नसेल तर ६०% एवढा शेतसारा आकारला जात असे. ब्रिटिशांनी पूर्वीसारखा संपूर्ण गावाला मिळून शेतसारा न आकारता प्रत्येक शेतकऱ्याकडून वैयक्तिकरित्या शेतसारा आकारून गोळा करण्यास सुरुवात केली. ब्रिटिशांनी रयतवारीसोबतच कायमधारा पद्धती (या पद्धतीला जमीनदारी पद्धत असेदेखील म्हणत व ही पद्धती प्रामुख्याने तत्कालीन बंगाल प्रांतात राबविली गेली. या पद्धतीमध्ये जमीनदारांच्या भूमिकेला अनन्यसाधारण महत्त्व होते किंबहुना त्यामुळेच या पद्धतीला जमीनदारी पद्धत असेदेखील म्हणत असत.), महलवारी पद्धती व तालुकदारी या शेतसारा पद्धती देशाच्या विविध भागांमध्ये राबविल्या.

### आदिवासींचे उठाव

ब्रिटिशांना महाराष्ट्रात वा मुंबई इलाख्यात सुरुवातीच्या काळात मोठ्या प्रमाणात आदिवासींच्या उठावांना सामोरे जावे लागले. १९व्या शतकात मुंबई इलाख्यात ब्रिटिश राजवटीविरुद्ध झालेले काही महत्त्वाचे आदिवासी उठाव म्हणजे रामोशांचे बंड, कोळ्यांचे बंड, गडकऱ्यांचा उठाव व गोंडांचा उठाव हे होत.

### रामोशांचे बंड वा उठाव

रामोशी ही मराठ्यांच्या सैन्यात लढणारी एक प्रमुख लढवय्यी जमात होती. मराठ्यांचा पाडाव झाल्यावर त्यांना या सैनिकी पेशाला मुकावे लागले. त्यामुळे त्यांच्यासमोर त्यांच्या उपजीविकेचा व उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला. यातूनच रामोशांनी उमाजी नाईक याच्या नेतृत्वाखाली ब्रिटिशांविरुद्ध बंड केले. उमाजी नाईकाला बापू त्रिंबकजी सावंत यानेदेखील मदत केली. १८२६ ते १८२९ या कालावधीत पुणे व पुण्याच्या आसपास रामोशांच्या बंडाला मोठा पाठिंबा मिळाला व या काळात हे बंड जोमाने सुरू होते. जरी ब्रिटिशांनी उमाजी नाईकाला पकडले व मृत्यूदंड दिला तरी रामोशांचे बंड सुरूच होते. रामोशी सामान्य रयतेचे शोषण करणाऱ्या सावकारांवर हल्ले करत असत.

### कोळ्यांचे बंड

कोळी ही आदिवासी जमात महाराष्ट्र तसेच गुजरातमध्ये आढळत असे. १८२८ साली ब्रिटिशांविरुद्ध झालेल्या कोळ्यांच्या बंडाचे नेतृत्व रामाजी भुंगेरे याने केले होते. रामाजी भुंगेरे हा सरकारी नोकरीत होता. मात्र त्याने या नोकरीचा त्याग केला व ब्रिटिशविरोधी कोळ्यांच्या बंडाचे नेतृत्व करणे पसंत केले. चिमाजी जाधव व भाऊ खरे या प्रसिद्ध मराठा सरदारांनी कोळ्यांच्या उठावाला पाठिंबा दिला होता.

कोळ्यांनी नंतरच्या काळात १८४४, १८४५ व १८७३ या तीन वर्षांत ब्रिटिशांविरुद्ध बंड केले होते.

१८४५ मध्ये पुण्यातील पुरंदर येथे कोळी व रामोशी हे ब्रिटिशांविरुद्ध एकत्र आले होते. रघु भुंगेरे, बापू भुंगेरे व होन्या यांनी वेगवेगळ्या वेळी कोळ्यांच्या उठावाचे नेतृत्व केले होते. काही काळ कोळ्यांनी पेशव्यांना पुन्हा एकदा आपला शासक म्हणून घोषित केले होते. ब्रिटिशांनी खूप प्रयत्न केल्यानंतर त्यांना १८७० च्या दशकात कोळ्यांना शांत करण्यात यश आले.

**भिल्लांचे बंड**

पारंपरिकरित्या भिल्ल हे महाराष्ट्राचा पश्चिमेकडील भाग व प्रामुख्याने खानदेशात राहात आले आहेत. खानदेशातील सातपुडा पर्वतरांगांच्या भागात भिल्लांची संख्या लक्षणीय होती. ब्रिटिशांना असे वाटत होते की, त्रिंबकजी डेंगळे या दुसऱ्या बाजीरावाच्या सरदाराचा भिल्लांना पाठिंबा होता व त्याच्या सांगण्यावरून त्यांनी ब्रिटिशांविरुद्ध बंड केले.

भिल्लांनी १८१८, १८१९ व १८४६ या वर्षांत सातपुडा पर्वत रांगांतील व माळव्यातील अनेक ठिकाणी उठाव केले होते. ब्रिटिशांना भिल्लांचे बंड थोपविण्यासाठी (वा नियंत्रणात आणण्यासाठी) बळासोबतच शांततेच्या मार्गाने त्यांची समजूत काढण्याचा मार्ग पत्करावा लागला. तसेच, त्यांनी लढणे सोडून देऊन, शेती करण्यासाठी त्यांचे मन वळवून, त्यांना तसे पटवून द्यावे लागले.

**गडकरी उठाव (गडकऱ्यांचा उठाव)**

गडकरी ही मराठ्यांच्या किल्ल्यातील शिबंदी व रक्षण करणारी जमात होती. मराठ्यांचा पाडाव झाल्यावर गडकऱ्यांना आपल्या वडिलोपार्जित कामाला वा उपजीविकेच्या साधनाला मुकावे लागले. तसेच ब्रिटिश शासनाने त्यांच्याकडे असलेल्या जमिनीवर महसूल आकारण्यास सुरुवात केली. या कारणांमुळे पश्चिम महाराष्ट्रात गडकऱ्यांचा उठाव झाला. त्यांनी बंड करून पन्हाळगड व पवणागड ताब्यात घेतले होते. गडकऱ्यांच्या उठावात सामान्य लोकदेखील बऱ्याच प्रमाणात सामील झाले होते.

**गोंडांचे बंड**

गोंड ही आदिवासी जमात महाराष्ट्रात प्रामुख्याने पूर्व विदर्भातील चंद्रपूर व गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये आढळते. १९८१ साली चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन होऊन चंद्रपूर व गडचिरोली हे दोन जिल्हे निर्माण झाले.

चंद्रपूर व आसपासच्या परिसरावर ऐतिहासिकदृष्ट्या गोंड या आदिवासी जमातीचे राज्य होते. असे म्हटले जाते की, फार पूर्वी प्राचीन काळात गोंडांच्या अगोदर या भागावर सर्पपूजा करणाऱ्या नागवंशीय लोकांचे राज्य होते.

गोंडांनी नागपूरच्या भोसल्यांना ब्रिटिशांविरुद्ध मदत केली होती. जेव्हा १८५७ च्या उठावाला सुरुवात झाली तेव्हा या भागात गोंडांनी बंड केले. बाबूराव गोंड हा गोंडांचा नेता होता. परंतु तो फितुरीमुळे पकडला गेला व त्याला मृत्यूदंड देण्यात आला.

**आदिवासींच्या उठावाची कारणे**

आदिवासींच्या ब्रिटिशांविरुद्धच्या बंडांची काही प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत :

गरीब जनतेचे आर्थिक शोषण करणाऱ्या सावकारांविरुद्ध आदिवासींच्या मनात रोष होता व सर्वसाधारण समज असा होता की, सावकारांना ब्रिटिश यंत्रणेचा पाठिंबा आहे. त्यामुळे सावकारांना पाठीशी घालणाऱ्या ब्रिटिशांविरुद्ध बंड होणे साहजिकच होते.

ब्रिटिशांनी जंगल व वनांवर सरकारची मक्तेदारी व नियंत्रण प्रस्थापित करण्यास सुरुवात केली. हे आदिवासींना रुचले नाही. याचे प्रमुख कारण असे होते

की, ह्या जमाती पूर्वापारपासून वनांत राहात आल्या होत्या. त्यांना त्यांच्या जीवनात व मुख्यतः जंगल-वनांत सरकारने हस्तक्षेप करणे पसंत नव्हते. यापूर्वी भारतीय शासकांनी वा राजांनी कधी असा हस्तक्षेप केला नव्हता. ब्रिटिशांनी कालांतराने नवीन वन-कायदे बनवून जंगल व वनसंपत्ती ही सरकारची संपत्ती असल्याचे जाहीर केले. त्यामुळे आदिवासींच्या उपजीविकेच्या साधनांवरच गदा आल्यासारखे झाले. अगदी ठाण्यासारख्या आदिवासी जिल्ह्यातील आदिवासींच्या क्षेत्रात असलेल्या तलावांचे पाणी मुंबई सारख्या शहरांमध्ये तेथील लोकांची पिण्याच्या पाण्याची सोय करण्यासाठी नेण्यात आले.

ब्रिटिशांनी घडवून आणलेल्या या विविध राजकीय, आर्थिक तसेच प्रशासकीय बदलांमुळे आदिवासींच्या जीवनशैलीत आमूलाग्र बदल तर झालाच; परंतु त्यांचे आर्थिक जीवन पूर्णतः विस्कळीत झाले. आदिवासींना आपली पारंपरिक जीवनशैली सोडून देऊन खाणकामगार म्हणून व इतर हीन स्वरूपाची कामे करण्याची वेळ आली. त्यामुळे आदिवासींनी ब्रिटिशांविरुद्ध बंड केले.

**शेतकऱ्यांची चळवळ वा बंड**

१९ व्या शतकात महाराष्ट्रातील शेतकरी समुदाय निश्चितच ब्रिटिश राजवटीवर नाराज होता यात वाद नाही. त्यांना ब्रिटिश व्यवस्थेतील काही नकारात्मक बाबी नापसंत होत्या व त्यामुळे त्यांनी ब्रिटिशांविरुद्ध बंड केले असे म्हणणे वावगे ठरू नये.

आपण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या उठावांचा विचार केल्यास असे लक्षात येते की, हे उठाव प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्रातील अहमदनगर व पुणे या जिल्ह्यांमध्ये झाले. शेतकऱ्यांचा एक प्रमुख व मोठा उठाव १८७५ सालात झाला. शेतकऱ्यांच्या या उठावाला (वा बंडाला) 'दखखनचे दंगे' देखील म्हटले गेले. शेतकऱ्यांचा हा उठाव प्रामुख्याने पुण्यातील सुपा, पुरंदर, शिरूर, इंदापूर आदी ठिकाणी; तर अहमदनगरमधील श्रीगोंदा, पारनेर, कर्जत या ठिकाणी मोठ्या प्रमाणात झाल्याचे आढळते. ब्रिटिशांनी अवलंबिलेली नवीन शेतसारा पद्धतीविषयीची नाराजी व महत्त्वाचे म्हणजे सावकार जास्त व्याजदर लावून करत असलेले शोषण ही या शेतकऱ्यांच्या उठावाची प्रमुख कारणे होती.

ब्रिटिश पैशाच्या स्वरूपात वा रोखीने शेतसारा घेत असत. त्यामुळे अनेकदा शेतकऱ्यांना सावकारांकडून पैशाच्या स्वरूपात कर्ज घेण्याची वेळ येत असे व सावकार साधारणतः चक्रवाढ व्याज (वा अतिजास्त प्रमाणात व्याज) आकारत असल्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होत असे. चुकीच्या सरकारी धोरणांमुळे सावकारांचा वर्ग निर्माण झाला असे म्हणणे वावगे ठरू नये. व्याजाने कर्ज देणारे सावकार हे बहुतेकवेळा मारवाडी असत. शेतकऱ्यांचा असा पक्का समज झाला होता की, मारवाडी सावकारांच्या या वर्गाला ब्रिटिश सरकारी यंत्रणेचा पाठिंबा होता.

शेतकऱ्यांनी आपल्या या उठावादरम्यान मारवाडी सावकारांच्या घरावर हल्ले करण्यास सुरुवात केली. सावकारांनी शेतकऱ्यांची जमीन तारण म्हणून ठेवून घेऊन त्यांना कर्ज दिले होते. त्यामुळे सावकार कर्जाची परतफेड न झाल्यावर शेतकऱ्यांची शेतजमीन हडप करतील अशी भीती शेतकऱ्यांना वाटत होती वा तशी स्थिती निर्माण झाली होती. या शोषणामुळे शेतकऱ्याची परिस्थिती दिवसेंदिवस खालावत चालली होती व ते आपली शेतीसुद्धा गमावून बसतील असा प्रसंग निर्माण झाला होता. त्यामुळे शेवटचा पर्याय म्हणून शेतकऱ्यांनी बंडाचा मार्ग पत्करला.

सरकारने १८७५ च्या महाराष्ट्रातील या शेतकऱ्यांच्या बंडाची वा उठावाची चौकशी करण्यासाठी एक आयोग नेमला होता. या चौकशी आयोगावर मेसर्स

रिचे, लियॉन, ऑकलंड, कॉल्विन व रावबहादूर शंभूप्रसाद लक्ष्मीलाल आदी सदस्य होते. या आयोगाने आपला अहवाल सादर केल्यानंतर ब्रिटिश सरकारने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी व त्यांच्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने १८७९ साली 'डेक्कन ॲग्रिकल्चरिस्ट्स ॲक्ट' हा कायदा बनवला.

तत्पूर्वी १८५२ सालात खानदेशातील सावदा, रावेर व चोपडा या भागांमध्ये शेतकऱ्यांनी शेतजमिनीचे सर्वेक्षण व मोजणी करण्यासाठी आलेल्या सरकारी अधिकाऱ्यांना विरोध केला होता. जिल्हाधिकारी व इतर लष्करी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना सर्वेक्षणाच्या व शेतमोजणीच्या सकारात्मक बाबी समजावून सांगितल्यावर शेतकऱ्यांनी सरकारी अधिकाऱ्यांना आपले काम करू दिले.

आपण पाहिलेच की, १८७५ साली शेतकऱ्यांनी सावकार करत असलेल्या शोषणाविरुद्ध बंड केले. त्यानंतर १८७९ मध्ये वासुदेव बळवंत फडके यांनी एकप्रकारे ब्रिटिशांविरुद्ध युद्ध पुकारले. ब्रिटिशांची जाचक राजवट व शेतकऱ्यांचे होत असलेल्या हालअपेष्टा पाहून वासुदेव बळवंत फडके यांना फार चीड आली. वासुदेव बळवंत फडके यांचा जन्म सध्याच्या रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील शिरढोण या गावी झाला होता. ते चित्पावन ब्राह्मण होते. त्यांना कुस्ती व इतर प्रकारचे शारीरिक शिक्षण व व्यायामांचे प्रशिक्षण लहुजी बुवा राऊत यांनी दिले होते. लहुजी बुवा राऊत हे अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या मांग या जातीतील होते. लहुजी बुवांनी महात्मा फुलेंनादेखील शारीरिक शिक्षण व व्यायामाचे प्रशिक्षण दिले होते.

वासुदेव बळवंत फडकेंच्या बंडात रामोशी सुद्धा सामील झाले होते. फडक्यांनी पुण्यात वामन प्रभाकर भावे व लक्ष्मणराव इंदापूरकर यांच्यासोबत 'नेटिव्ह पूना इन्स्टिट्यूशन' या शाळेची स्थापना केली. महाराष्ट्रातील प्रसिद्ध इतिहासकार वि. का. राजवाडे यांनी याच शाळेतून शिक्षण घेतले होते. ही शाळा भावे स्कूल म्हणून प्रसिद्ध पावली. दुर्दैवाने वासुदेव बळवंत फडकेंना पकडण्यात ब्रिटिशांना यश आले. ब्रिटिशांनी वासुदेव बळवंत फडकेंना येमेन या आखाती देशातील एडेन येथे कैदेत ठेवले व तेथेच त्यांचा मृत्यू झाला.

१८३२ सालात शेतकऱ्यांनी व सामान्य जनतेने पुण्यात 'धान्य उठाव' केला होता. यावेळी दुष्काळामुळे अन्नधान्याचा तुटवडा निर्माण झाला होता व त्यातच व्यापाऱ्यांनी अन्नधान्याच्या किंमती वाढविल्या होत्या. त्यामुळे व्यापाऱ्यांचा निषेध म्हणून ६ नोव्हेंबर १८३२ रोजी पुण्यात संतप्त जमावाने बाजारातील धान्यांच्या दुकानांवर हल्ले करून ती लुटण्यास सुरुवात केली. सरकारी यंत्रणेला परिस्थिती नियंत्रणाखाली आणण्यासाठी जवळजवळ दोन दिवस लागले. या घटनेवरून सरकारी यंत्रणेला व्यापारीवर्ग सामान्य जनतेचे करत असलेले शोषण रोखण्यात आलेले अपयश निदर्शनास येते. तसेच व्यापारी कशाप्रकारे अनैतिक मार्गाने लोकांचे शोषण करत असत ही बाब अधोरेखित होते.

महात्मा जोतिबा फुले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, तसेच सेनापती बापट यांनीदेखील शेतकऱ्यांच्या प्रश्नावर त्या काळात आवाज उठविलेला असल्याचे निदर्शनास येते.

समाजसुधारणेव्यतिरिक्त महात्मा फुलेंनी शेतकऱ्यांचे प्रश्न सरकारदरबारी मांडून ते सोडविण्यासाठी प्रयत्न केले होते. महात्मा फुलेंनी शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी पुण्यातील जुन्नर, तसेच इतर ठिकाणांना भेटी दिल्या होत्या. १८८८ साली इंग्लंडच्या राजपुत्राने पुण्याला भेट दिली असता महात्मा फुलेंनी त्याच्यासमोर शेतकऱ्यांची कैफियत मांडली होती. महात्मा फुलेंनी

सरकारने शेतकऱ्यांच्या मुलांसाठी वसतिगृहांची सोय करावी अशी मागणी केली होती.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनीसुद्धा शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले होते. ते प्रार्थना समाजाशी देखील निगडित होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदेंनी शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेसाठी प्रामुख्याने सावकारांना जबाबदार धरले व सरकारी अधिकाऱ्यांवर टीका केली. महर्षी शिंदेंना शेतकऱ्यांच्या समस्यांविषयी चांगली जाण होती कारण ते स्वत: शेतकरी कुटुंबातील होते.

सेनापती बापट यांचे मूळ नाव पांडुरंग महादेव बापट असे होते. त्यांनी १९२१ साली मुळशी सत्याग्रह केला होता. या धरणामुळे आसपासच्या शेतकऱ्यांच्या बऱ्याच शेतजमिनी पाण्याखाली जाणार होत्या. त्यामुळे या शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सेनापती बापट यांनी मुळशी सत्याग्रह केला होता. सेनापती बापट यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य होऊन त्यांना न्याय मिळाला.

**समारोप**

१८१८ साली ब्रिटिशांची महाराष्ट्रावर राजवट सुरू झाल्यावर महाराष्ट्रातील व एकंदरीतच भारतातील मध्ययुगाचा अंत होऊन आधुनिक काळाची सुरुवात झाली असे म्हणणे वावगे ठरू नये. मराठी मुलखात ब्रिटिशांपूर्वी एतद्देशीयांची स्वत:ची एक सामाजिक, आर्थिक, राजकीय व प्रशासकीय व्यवस्था होती. ब्रिटिशांनी या व्यवस्थेत बदल घडवून तिचे पाश्चिमात्यकरण करण्याची प्रक्रिया सुरू केली. नंतरच्या काळात ब्रिटिशांनी सुरू केलेल्या पाश्चिमात्य शिक्षण प्रणालीमुळे भारतात आंग्लविद्याविभूषीत वर्ग निर्माण झाला व समाजसुधारणा चळवळींची सुरुवात झाली. १८१८ साली जेव्हा महाराष्ट्रात ब्रिटिश राजवटीची सुरुवात झाली तेव्हा पूर्वेकडील संस्कृतीचा पाश्चिमात्य सभ्यतेशी मिलाफ वा मेळ होत होता व महाराष्ट्र एका वेगळ्याच वळणावर उभा होता असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

**संदर्भ :**


नायटिन्थ सेंच्यूरी हिस्ट्री ऑफ महाराष्ट्र-भाग-१ : बी. आर. सुनथनकर

नायटिन्थ सेंच्यूरी हिस्ट्री ऑफ महाराष्ट्र-भाग-२ : बी. आर. सुनथनकर

महाराष्ट्र संस्कृती : डॉ. पुरुषोत्तम गणेश सहस्रबुद्धे

मराठी विश्वकोश



**- सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email : subhashinscotland@gmail.com


•••


दिशा नियमित वाचा.

आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

# आषाढस्य प्रथम दिवसे : महाकवी कालिदास दिनानिमित्ताने

*विश्व साहित्यात महाकवी कालिदासाचे योगदान खूप मोठे आहे. आषाढ महिन्याचा पहिला दिवस हा महाकवी कालिदास दिन म्हणून जगभर साजरा होतो. यावर्षी हा दिवस २१ जून रोजी येत आहे. त्यानिमित्ताने कालिदासाच्या प्रसिद्ध मेघदूत या काव्याचे रसग्रहण करणारा डॉ. प्रशांत पुरुषोत्तम धर्माधिकारी यांचा लेख – संपादक*

आषाढ महिन्याचा पहिला दिवस हा, 'महाकवी कालिदास दिन' म्हणून साजरा होतो. यावर्षी हा दिवस २२ जून रोजी येत आहे. त्यानिमित्ताने कालिदासाच्या एकूणच साहित्यिक अवकाशाचे चिंतन व्हावे असा मानस सर्वांच्या मनात असतो. महाकवी कालिदासाने लिहिलेल्या 'मेघदूत' या खंड काव्याच्या दुसऱ्या श्लोकात

आषाढस्य प्रथम दिवसे मेघमाश्लीष्ट सानुम्
वप्रक्रीडा परिणतगज प्रेक्षणीयं ददर्श ।।

असा उल्लेख येतो. कालिदासाच्या जन्मतिथी बाबत विद्वानांमध्ये सहमती नाही. कालिदासाच्या जन्माचा काळ निश्चित नसल्यामुळे त्याने मेघदूतात वर्णन केलेल्या आषाढाच्या पहिल्या दिवशी महाकवी कालिदास दिन साजरा केला जातो. एखाद्या साहित्यिकाच्या कृतीतील उल्लेखावरून त्याचा जन्मदिन साजरा करणे ही कल्पना खूपच छान आहे. मेघदूतामध्ये कालिदासाने निसर्गाचे खूपच सुंदर वर्णन केले आहे. मेघदूताचा प्रभाव भारतीय भाषांमधील अनेक कवींच्या साहित्यावर; तसेच गटे, मॅक्समुलर इत्यादी विश्व कवींच्या साहित्यावर देखील पहावयास मिळतो. प्रो. मॅक्सम्युलर लिहितात –

Rarely has a man walked our earth who observed the phenomena of living nature as accurately as he, though his accuracy was off course that of a poet and not that of a scientist.

कालिदासाने संस्कृत साहित्याची दालनं एकाहून एक अशा मौल्यवान रत्नांनी भरवली आहेत.

अद्यापि यस्य गायन्ति कीर्ती: कवीवरा अपि।
नमामि कालिदासम् तं भारतीयं महाकवीम्।।

भारतीय संस्कृतीला अखिल जगतात मूर्धन्य स्थानी प्रस्थापित करण्यात महाकवी कालिदासांचे श्रेष्ठत्व समावलेले आहे. कविकुलगुरु या बिरुदाचा मानकरी असलेला कालिदास म्हणजे भारतीय कवींच्या शिरपेचातला मुकुटमणी म्हणता येईल. आषाढ महिन्याच्या पहिल्या दिवशी पावसाळ्याची सुरुवात होते. महाकवी कालिदासाने आपल्या जगद्विख्यात मेघदूत या काव्याच्या सुरुवातीला पावसाळ्याच्या सुरुवातीचे नितांत सुंदर वर्णन केले आहे

मराठीतील ज्येष्ठ कवी वसंत बापट यांनी आपल्या जीविचा जीवलग कालिदास या लेखामध्ये असं म्हटलं आहे की, ''काही कवी प्रेमिकाच्या दृष्टीतून निसर्गाकडे पाहतात. काही त्याच्याकडून शिकवण मिळण्याची अपेक्षा करतात. 'Books in the running Brooks' अशी स्वतःची मनोभूमिका दर्शवतात. 'Teach me blithe spirit, bird thou never wert' असे सरळ सरळ आवाहन करतात. लवर्स फिलॉसॉफी Lovers Philosophy सारख्या कवितेत सृष्टीमध्ये भरून असलेली प्रणयक्रीडा ब्रिटिश कवी शेले चविष्टपणे सांगतो. पण कालिदासाची गोष्टच निराळी. आपल्या जीविताच्या प्रवासात प्रत्येक वळणावर आणि वाकणावर त्याला निसर्गाचा नवा नवा प्रत्यय येत राहतो!''

मेघदूतात महाकवी कालिदासाने एक हृदयस्पर्शी कथा रेखाटली आहे. हेमामाली आणि विशालाक्षी या

नूतन विवाहीत यक्ष दाम्पत्याची ही कथा आहे. आपला स्वामी कुबेराच्या सेवेमध्ये प्रमाद घडल्यामुळे कुबेराने हेममालीला एक वर्षाच्या विजनवासाची शिक्षा दिली. नुकतंच लग्न झालेल्या आपल्या प्रिय पत्नी पासून दूर रामगिरी पर्वतावर यक्ष एक वर्षासाठी दूर आला. प्रियाविरहाचा हा काळ रामगिरी पर्वतावर कंठत असताना आठ महिने कसेबसे गेले व पावसाळ्याची सुरुवात झाली. हाच तो आषाढाचा पहिला दिवस. 'आषाढ का एक दिन' या नावाचे हिंदी साहित्यिक मोहन राकेश यांचे नाटकही प्रसिद्ध आहे. आपल्या प्रिय पत्नीची आकाशात दाटलेल्या मेघांकडे बघून यक्षाला खूप आठवण येते आणि तो त्या मेघाकडे उत्सुक होऊन पाहू लागतो. त्याची अवस्था-उपरि घनं घनरटितं, दूरे दयिता किमेतद् आपतितम्। अशी होते.

कुटजकुसुमांची अर्थात त्याच्या कुटीमधील सुंदर फुलांची उधळण करून अतिशय प्रिय वाक्याने तो मेघाला बोलू लागतो. विरह दुःखाने पीडित व असाहाय्य झालेला यक्ष पत्नीच्या आठवणीने उतावीळ होऊन मेघालाच आपला दूत बनवतो आणि हे मेघदूत नावाचे अतुल्य काव्य कालिदासाच्या सिद्धहस्त लेखणीतून जन्म घेते.

रामगिरी पर्वतावर अर्थात सध्याचे रामटेक येथे असलेला हा यक्ष मेघाला आपल्या पत्नीकडे संदेश पोहोचवण्यासाठी जाण्याची विनंती करतो. तसेच त्याच्या अलकावती नगरीचा मार्ग देखील सांगतो. यक्षाची राजधानी असलेल्या अलकापुरी नगरीत त्याचे घर आहे. वाटेत जाताना आलेल्या नयनरम्य निसर्ग चित्रणाने दृष्टीचे पारणे फिटते. विदिशा नगरी व तेथून उज्जैनी नगरीत जाण्याचे मेघाला यक्ष सांगतो. 'उज्जैन नगरीत महाकाल मंदिराच्या दर्शनानंतर निरविंध्या या नदीचे पाणी पिऊन तू अवंती नगरीत जा. तुला वाटेत मयूर रस्ता दाखवतील.' असेही यक्ष मेघाला सांगतो. 'हे मेघा तू आल्यामुळे ज्यांचे पती व्यापारासाठी गेले आहेत अशा स्त्रियांना त्यांच्या आगमनाची चाहूल लागेल. हंसाचासुद्धा प्रणय काळ पावसाळ्यात तुझ्या आगमनामुळे झाल्यामुळे ते तुला त्यांच्या थव्याची माला करून घालतील' असे कालिदास म्हणतो.

'मेघाच्या घनश्याम अशा अंगावर मधूनच दिसणारा इंद्रधनुष्य शोभून दिसेल व मेघ मोरपीस धारण करणाऱ्या गोपाळकृष्ण सारखा सुंदर दिसेल' असे यक्ष मेघास सांगतो. मेघदूतातील मार्ग हा महाराष्ट्रातील नागपूर जवळच्या रामटेक पासून ते उत्तरेकडील अलकावती नगरी पर्यंतचा आहे. या संपूर्ण मार्गाचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात येते की, कालिदासाला भारताच्या भूगोलाचा तसेच साधनसंपत्ती, नदी, पर्वत, निसर्गाचे सौंदर्य याचा खूप व्यासंग होता. या काव्यातून राष्ट्रीय एकात्मतेचा भावही प्रकट होतो. सध्या झालेले उघडेबोडके पर्वत व पर्यावरणाचा ऱ्हास कालिदासाला अपेक्षित नाही. कालिदासाला वृक्षांनी सजलेले व फळाफुलांनी वेलींनी नटलेली सुजलाम सुफलाम अशी वनसृष्टी अपेक्षित आहे. कालिदासाच्या मेघदूतात उल्लेख झालेल्या फळांचा, फुलांचा, वेलींचा व निसर्गाच्या चित्रणाचा स्वतंत्र अभ्यास करता येईल.

यक्ष राहत असलेल्या अलकापुरीचे वर्णन तर डोळ्यांना थक्क करणारे आहे. जेथे डोळ्याला पाणी हे केवळ आनंदाश्रूमुळे येते, जेथे ताप हा केवळ प्रियेच्या संगमामुळे येतो, जेथे कलह हा केवळ प्रिय सखीच्या प्रणया शिवाय होत नाही, आणि जिथे यौवना शिवाय दुसरे कोणतेही वय नाही अशा अलका नगरीचे वर्णन कालिदास करतो. मेघाला यक्षाच्या पत्नीला संदेश द्यावयाचा आहे व अलका नगरीतील यक्षाचे घर मेघ कसा ओळखेल यावर कालिदास यक्षाच्या घराचं खूप सुंदर वर्णन करतात.

तत्रागारं धनपतिगृहादूत्तरेणास्मदीयं
दुरालक्ष्यम् सुरपतिधनुशचारुणा तोरणेन।

यस्योपांते कृतकतनय: कांतया वर्धितो मे
हस्तप्राप्यस्तबकनमितो बालमंदारवृक्ष:।

कुबेराच्या घराच्या उत्तर दिशेला माझे घर तुला दुरूनच दिसेल. माझ्या घराला तोरण म्हणून इंद्रधनुष्याची योजना केली आहे .माझ्या घरासमोर माझ्या पत्नीच्या हातांनी पाणी पिऊन पुष्ट असा व आपल्या फुलांच्या गुच्छामुळे वाकलेला बाल मंदार वृक्ष आहे.

शांता शेळके या ज्येष्ठ मराठी कवयित्रीनी यशाच्या घराच्या वर्णनाच्या लोकांचे सुंदर मराठीत समश्लोकी भाषांतर केले आहे ते असे –

कुबेर सदना जवळी आहे उत्तरेस ते भवन आमुचे
दुरून भरते नयनी कारण तोरण दारी इंद्रधनुचे
प्रियपुत्रासम सखीने माझ्या वाढविलेला तरू अंगणी
मंदाराचा गुच्छ जयाचे सहज करामधी येती झुकुनी

'अशा या घरात विरहामुळे व्याकुळ अशी माझी पत्नी आहे' असे यक्ष मेघाला सांगतो. कालिदासाने यक्षाच्या पत्नीचे केलेले वर्णन हे विरहातूर अशा नायिकेचे वर्णन आहे.

'विरहामुळे मितभाषी झालेली, रडून डोळे सुजलेली व पतीची आठवण करत आणि दिवस मोजत असलेल्या माझ्या पत्नीला पाहून हे मेघा तुला तिची ओळख पटेल. आपल्या पुढ्यात असलेल्या विणेवर माझ्या नावाने युक्त अशा पदांचे गायन करणारी, अश्रू विणेवर पडल्यामुळे ओल्या झालेल्या तारेला कसेतरी सावरत ती पुन्हा पुन्हा पद गुणगुणत बसली असेल.'

शांता शेळके यांनी मेघदूताचा भावानुवाद केला आहे. शांताबाईंच्या अनुवादात आलेले उत्तर मेघा मधले काही श्लोक मुळातून वाचण्यासारखे आहेत. मराठी भाषेमध्ये कालिदासाच्या संस्कृत श्लोकांचे समश्लोकी त्यांनी लिहिलेली आहे. अलका नगरीतील यक्षाचे घर, घरा भोवतालची सुंदर बाग, यक्ष पत्नी यांचे वर्णन शांताबाई खूप छान करतात. त्यांनी केलेले विरही यक्षपत्नीचे वर्णन असे आहे :

मलिनवसनी वा मांडीवरती वीणा घेऊन असेल बसली
नाव गुंफिले जयात माझे गीत गावया आतुर झाली
गाताना पण नयनी आसू  ओघळती ते तारांवरती
स्वये योजिल्या तानांची ही सखीला होते, हाय! विस्मृती!
उंबरठ्यावर फुले मांडुनी एक एक ती दिवस मोजिते
किती विरहाचे मास राहिले पुन्हा पुन्हा अजमावुनी बघते
रमते तेव्हा कल्पनेत मम सहवासाची चित्रे रेखून
विरहामध्ये रमणी बहुधा असेच करिती मनोविनोदन।

'हे मेघा अशा माझ्या भेटीला आतुर असलेल्या पत्नीला माझा संदेश सांग, की  मी अजून चार महिन्यांनी कार्तिक शुक्ल एकादशीला देवदीपोत्सवाच्या दिवशी परत येईन. तोपर्यंत तू माझी वाट पहा. पती खूप दिवस झाले परत येत नाही असे समजून कुठलाही वाईट विचार मनात येऊ देऊ नकोस'. असा संदेश मेघाकडे यक्ष देतो.

मानवी संबंधांचे सत्य व नात्याची घट्ट वीण कालिदास आपल्या वाङ्मयात सुंदरपणे चित्रित करतो. 'दोन प्रेमी दूर राहिले तरीही त्यांच्यातील प्रेम हे वाढत जाते' हा संदेश कालिदासाला यात द्यायचा आहे. भारतीय संस्कृतीत धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चार पुरुषार्थांच्या पूर्तीसाठी गृहस्थाश्रम सांगितला आहे. त्यात दाम्पत्य जीवनात एकमेकांवरील विश्वास, ज्याला म्यूच्यूअल अंडस्टँडिंग असे आपण म्हणतो, त्याची वीण घट्ट करण्यासाठी मेघदूताचासारख्या गीतीकाव्याची रचना झाली.

अंत:पुरातील गुजगोष्टी पासून हिमालयाच्या उत्तुंग शिखरापर्यंत कालिदासाची लेखणी लीलया संचार करते.

(पृष्ठ क्र. २५ वर)

# चला मालवणाक ...

*या लेखात कोकणातील मालवण या गावाचे वर्णन केले आहे - संपादक*

प्रारंभी विनंती करू गणपती विद्यादया सागरा
अज्ञानत्व हरोनी बुद्धी मती दे आराध्य मोरेश्वरा
चिंता, क्लेश, दारिद्र, दुःख अवघे देशांतरा पाठवी
हेरंबा गणनायका गजमुखा भक्तां बहू तोषवी

मंडळी, तुम्ही विचार करत असाल हा श्लोक इकडे कशाला? काय गरज ह्या श्लोकाची इथे?

मित्रहो, माझा हा लेख मुळात माझ्या गावावर लिहिला आहे आणि आमच्याकडे पद्धत आहे की, कुठलंही काम सुरू करण्याअगोदर गणपतीचं स्मरण करावं.

मालवण...

मालवण म्हणजे लाल मातीतली वाट.. मालवण म्हणजे निसर्गाचा थाट...

माझं गाव मालवण. मालवण तळकोकणातलं समुद्राजवळ वसलेलं एक विलोभनीय नैसर्गिक ठिकाण. मालवणला तुम्ही कुडाळ व्हाया चौके जाऊ शकतात, कणकवली मार्गे व्हाया आचरा मालवणला तुम्ही येऊ शकतात. मुंबईहून मालवण पर्यंत महामार्गाने पोचायला साधारण ११ ते १२ तास लागतात. मालवण शहरात शिरतानाच तुमच्या डाव्या बाजूला लक्ष्मी-नारायणाचे मंदिर लागतं. सुंदर कोरीवकाम केलेले, तेवढाच सुंदर परिसर आणि नकळतपणे हाथ जोडले जातात. थोडं पुढे आल्यावर उजव्या हाताला एक फाटा लागतो तो सरळ अंगणेवाडी म्हणजे भराडीदेवी ह्या देवस्थानाकडे जातो. साधारण १० मैलांवर हे देवस्थान आहे.

पुढे मालवणचा एसटी बस आगार लागतो. बस आगारातून आपल्याला कुठे जायचं असेल त्या गावाची एसटी त्या त्या फलटावर उभ्या असतात. त्याचबरोबर रिक्षाही आगरापाशी उभ्या असतात. ह्या मालवण एसटी आगाराजवळ परबांचं छोटंसं हॉटेल आहे. तिकडे मिळणारी कट उसळ, पुरी आणि गरम चहा याचा मुकाबलाच नाही. मन प्रसन्न होत त्याचा आस्वाद घेऊन तिकडून थोडं पुढे आलात तर भरड नावाचा नाका लागतो आणि तो प्रसिद्ध आहे. भरड नाका हा तारकर्ली, देवबाग संगम, देवली ह्या पर्यटन ठिकाणी जाण्याच्या मार्ग आहे.

सिंधुदुर्ग किल्ला, तारकर्ली बीच, देवबाग बीच यांच्यामुळे मालवण हे शांत गाव पर्यटनाच्या नकाशावर आलंय. मालवण म्हणजे फक्त सिंधुदुर्ग किल्ला, समुद्र, बीचेस आणि मासे असा अनेकांचा समज असतो, पण मालवणची भटकंती म्हणजे केवळ एवढंच नसून एक सुंदर 'खाद्य-भटकंती'सुद्धा आहे.

भरड नाक्यापासून पुढे मालवणच्या मुख्य बाजारपेठेची सुरुवात होते. बाजारपेठ म्हणजे खवय्यांची चांदी.

मालवणी खाजा, काजू, अंबापोळी, फणसपोळी, रातांबे (कोकम), आगूळ (कोकमचा अर्क), पिठी (कुळदाची भरड), नारळाची वडी, ओले काजू , हापूस आंबे, घीवर, गावरान भेंडी, वांगी, शेगग्याची शेंग, कुलथाचं पीठ, सुरण वगैरे वगैरे ....हे झालं शाकाहारी खाण्याचं....ह्याच बाजारपेठाच्या डाव्या बाजूच्या तिसऱ्या गल्लीबोळात मांसाहारी खवय्याचं आवडीचं

ठिकाण दर्शनास येतं ते म्हणजे मालवणचा मासळी बाजार. मासळी बाजाराचं आता नुतनीकरण झालं असून ते प्रशस्त मोठं आणि हवेशीर झालं आहे. एकदा का मासळी बाजारात गेलात की वेगवेगळ्या प्रकारची मासळी पाहायला मिळेल. मासळी बाजाराच्या जरा पुढे किनाऱ्यावर सकाळी आणि संध्याकाळी अशा दोन वेळा मासळीचा लिलाव भरतो.

तिकडे मासळी बाजारापेक्षा स्वस्त भावात मिळते. पण तिकडे अख्खी टोपली किंवा वाटा घ्यावा लागतो.

बांगडा, सुरमई, सारंगा (हलवा), छोट्या, मध्यम व मोठ्या आकाराची कोळंबी, लॉबस्टर (झिंगा), कुरले (खेकडे) ते पण खाडीतले काळे आणि समुद्रातले रंगीत, मूळे (शिंपले), मुशी (शार्क माशांचे छोटे पिल्लू), पेडवे, कर्ली, म्हाकुल (पांढरा रंगाचा मासा आणि तो ऑक्टोपसचा प्रकार आहे. त्याला इंग्लिश मध्ये स्क्विड असे संबोधतात), कालव वगैरे वगैरे... विशेष म्हणजे मासळी बाजाराच्या पाठीमागेच १२ ते १३ कोळणी आपण घेतलेली मासळी साफ करून देतात. ते म्हणजे सर्वात मोठं काम आणि महिलांसाठीचं सुखच.

मासळी बाजाराच्या सुरवातीला सुक्की मासळी मिळते. त्यात पण वेगवेगळे प्रकार निदर्शनास येतात. जसे सुके मालवणी बांगडे, जवला, सोडे (सुक्की कोळंबी), वघीट, सुरमई, करदी इत्यादी.

मालवण जणू जीवाची हौस ...आणि मांसाहारी खवय्यांसाठी होते मौजच मौज!

मला चांगलं आठवतंय; लहान असतांना माझ्या आजी सोबत मासळी आणायला जायचो किंवा जेव्हा जेव्हा गावी जायचो तेव्हा तेव्हा बाजार हाट झाला की मस्त गरम बाम (बेसन पिठात, बारीक मिरची आणि कांदा टाकून केलेली भाजी) खायचो आणि त्याबरोबर गोटी सोडा.

गोटी सोडा गायब झाला आहे. अजूनही ती चव जिभेवर रेंगाळत आहे.

मालवण मध्ये देवस्थाने पण खूप आहेत आणि ती बघण्यासारखी आहेत. प्रामुख्याने कोकणात ग्रामदैवत हा असतोच.. तसा रामेश्वर हे आमचं म्हणजे मालवणी लोकांचं ग्रामदैवत आहे. त्याचबरोबर अंगणेवाडीतली अंगण्यांची कुलस्वामिनी भराडी देवी. सुवर्ण गणपती मंदिर हे कालनिर्णय दिनदर्शिचे संपादक साळगावकर यांनी बांधलेलं मालवण मेढ्यात आहे. तोंडवळीतले वघेश्वरी मंदिर, मालवण बाजारतलं हनुमानाचं मंदिर, गजबादेवी, कुडाळचा वेतोबा मंदिर, वायरीकडचा भूतनाथ मंदिर आणि मयेकरांची कुलस्वामिनी श्री केळबाई देवीचं मंदिर अशा अनेक देवदेवतांचे दर्शन होते.

ह्या धार्मिक यात्रेबरोबरच फिरण्याची अनेक ठिकाणे आहेत. जसे तारकर्लीचा समुद्र किनारा, मालवणचा समुद्र किनारा, मोरयाचा धोंडा (खासियत अशी की छत्रपतींनी जेव्हा सिंधुदुर्ग बांधण्यास प्रारंभ करायचं ठरवलं तेव्हा ह्या खडकाची गणपती म्हणून पूजा केली आणि किल्ल्याच्या बांधकामाला श्रीगणेश केला म्हणून तो मोरयाचा धोंडा) आणि तेथील नव्याने उदयास आलेले स्कुबा डायव्हिंग आणि वॉटर स्पोर्ट्स. जलदुर्ग मधला महत्त्वाचा गड म्हणजे सिंधुदुर्ग किल्ला. मालवणची शान. किल्ल्यात जाण्यासाठी मालवण किनाऱ्यावरून होडी सुटते त्याने जाता येतं. सिंधुदुर्ग किल्ल्यात छत्रपती शिवाजी महाराजांचं मंदिर आहे, किल्ल्यावर दोन फांद्यांचं नारळाचं झाड होतं पण वीज पडल्यामुळे ते नष्ट झालं. राणीची वेळ, गोड पाण्याच्या विहिरी, भक्कम तटबंदी अशी अनेक आकर्षित करणारी पाहण्यासारखी ठिकाणे आहेत. जिकडून होडी सुटते ती जागा म्हणजे मालवणचा धक्का. धक्का म्हणजे निर्मळ निसर्गाचा आनंद लुटण्याची जागा! जिकडे वाऱ्याचे झोत वाहतात, सोबत फेसाळणारा समुद्राच्या लाटा, लाटांवर उड्या मारणाऱ्या होड्या,

त्यावर लुकलुकणारे दिवे, पक्ष्यांचा थवा मोकळा विहार करणारा अगदी अगदी मोहक असं वातावरण. मालवणातलं माझं सर्वात आवडीचं ठिकाण. जिकडे निवांत बसण्याची अगदी योग्य जागा.

तसेच, मालवण धक्क्यापासून पुढे मालवण कचेरी कडे गेलात तर रॉक गार्डन आहे. जिकडे मोठ्या खडकांना फोडून मस्त फिरण्यासाठी, लहान मुलांना खेळण्यासाठी हे उद्यान तयार केले आहे... सगळ्यांनाच आकर्षित करणारा असे हे रॉक गार्डन. ह्याच ठिकाणाहून सूर्यास्त बघण्यासाठी पर्यटक हजेरी नक्की लावतोच.

मालवण कोलंब गावाचा जो समुद्र किनारा आहे त्याचं नाव चिवला बीच आणि मालवणला जाऊन चिवला बीचला भेट दिली नाही तर उपयोगच नाही. अतिशय शांत ठिकाण, स्वच्छ समुद्रकिनारा, पाण्यात खेळण्यासाठी सुरक्षित आणि मुख्य म्हणजे ह्या किनाऱ्यावर गझिबो उभारले आहेत ते एक प्रकारचे बांबुंनी बनवलेले जमिनीपासून ठरावीक उंचीवर उभारलेले शेड. गझिबोवर वेळ कधी निघून जातो कळत नाही.

मालवणची प्रमुख खासियत म्हणजे मालवणची खाद्य संस्कृती आणि ती सुरू होते मालवणी मसाल्यापासून; ज्यात गरम मसाला, हळद, मिरचीपासून सगळंच एकजीव असते म्हणूनच ह्या मसाल्याचा स्वाद शाकाहारी असो वा मांसाहारी सगळ्यांना आपलंसं करतो.

हा मसाला काळ्या वाटाण्याची उसळ, ओल्या काजूची भाजी, फंसुल्याची भाजी, आंब्याचा रायता, लोणची, आळूचं फतफत, वालाच भिरड, कुलथाची पिठी इत्यादी बरोबर कोंबडी वडे, मालवणी सुक्क मटन, मासळी फ्राय, कल्व्याचं तिखलं, मोरीचं मटन, कुरल्याचं कालवण सगळ्यांना हा एकच मसाला वापरला जातो.

मालवणमध्ये सकाळच्या नाष्ट्याला आंबोली (इडली, डोसाचे पिठाची जाड पोळी) चहा बरोबर खायला मस्तच, घावन (तांदळाच्या पिठाचे पातळ डोसे), रस पोळी किंवा गूळ पोळी, तांदळाची पेज (तांबडा तांदूळ जास्त पाण्यात शिजवून ते मुलांपासून थोरांपर्यंत प्यायला द्याच. ते एकप्रकारचं सलाईंच काम करते.) ह्या सगळ्यात ओले खोबरे सढळ हाताने टाकले जाते. त्याचप्रमाणे मालवणात मिळणारे पेय म्हणजे सोल कढी, कोकम सरबत, कैरीचं पन्हे, आवळ्याचं सरबत, नारळ पाणी आणि मालवणच्या माडीला देखील लोक पसंती देतात.

मालवणात दशावतार नाटक लोकांच्या मनोरंजनाचा एक महत्त्वाचा भाग आहे. ही नाटके प्रामुख्याने रात्रीची चालत, जिकडे उत्सव, जत्रा अथवा सप्ताह भरतो तिकडे. त्यावेळी स्थानिक लोक चहा, बटाटा वडे, खेळणी ह्यांची छोटी दुकाने मांडतात. ही नाटकं पौराणिक कथांवर आधारित असतात.

मालवण मध्ये शिमगा म्हणजे होळी, जत्रा, सप्ताह, गणपती, गुढीपाडवा, नागपंचमी असेल तेव्हा चाकरमान्यांची (जी मंडळी नोकरीसाठी मुंबई, पुण्यात इतर ठिकाणी कामानिमित्ताने स्थलांतरित होतात व वेळ असेल तेव्हा गावी येतात) गावाकडे येण्याची ओढ ही लागते.

कोकणी माणूस नारळाच्या पाण्याप्रमाणे गोड असतो, काही फणसासारखे बाहेरून कडक आणि आतून प्रेमळ असतात. काही लोक लाटांसारखी रागात उसळतात आणि लगेच शांतही होतात! निखळ निसर्ग प्रेम बरसून घ्यायचं असेल तर मालवणात नक्की या....

चला तर मंडळी, शेवटी जाता जाता गाऱ्हाणं (एक प्रकारची देवाला घातलेली साद आणि मंगल प्रसंगी काढलेली देवाची आठवण) घालतंय आणि तुम्हीपण म्हणा 'होय महाराजा...'

'हे बारा गावाच्या, बारा वेशीच्या, बारा बावडीच्या, बारा नाक्याच्या, बारा गल्लीच्या, बारा शहराच्या देवा महाराजा...'

'होय महाराजा...'

कला म्हणजे एखादी वस्तू नाही, तो एक मार्ग आहे.

'आमच्या विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर साहेब जे जे नवीन विचार करतील, जे जे जबाबदारी घेतली आणि इच्छा प्रकट करतील त्यांच्या इच्छा, विचार आणि जबाबदाऱ्या पूर्ण करे महाराजा...'

'होय महाराजा...'

'विद्या प्रसारक मंडळाचे जो कुटुंब असा त्यातल्या प्रत्येक सदस्यांना उत्तम आरोग्य आणि त्यांची ज्ञानाची भरभराटी होऊन देरे महाराजा...'

'होय महाराजा...'

'विद्या प्रसारक मंडळाच्या ठाण्यातील शाळा, महाविद्यालये, तसेच वेळणेश्वरचे महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय मधील विद्यार्थी संख्या वाढून दे रे महाराजा...'

'होय महाराजा...'

'आपल्या कोविद -१९ च्या समूहावर लिखाणांचा पाऊस पडू देरे महाराजा...'

'होय महाराजा...'

'आपल्या महाराष्ट्रावर किंबहुना संपूर्ण जगावर कोरोनाची महामारी पसरली आहे ती लवकरात लवकर संपुष्टात येऊन दे रे महाराजा....'

'होय महाराजा...'

येवा, कोकण आपलोच असा.... आणि मालवणचा कालवण खाऊक एकादा मालवणाक येवाच...

मंडळी, चला तर मग येतेय मी.....

**- स्वप्नील नंदकुमार मयेकर**
सुरक्षाकक्ष समन्वयक
विप्रमं महाविद्यालय परिसर, ठाणे
भ्रमणध्वनी - ९९२००८५८३७

●●●

(पृष्ठ क्र. ४ वरून -**ॲलन टुरिंग**)

विद्या प्रसारक मंडळाच्यावतीने दरवर्षी भारतीय विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्यासाठी इंग्लंडची शैक्षणिक सहल आयोजित करण्यात येते. या सहलीत ऑक्सफर्ड, केंब्रिज आणि लंडन या तीन शहरांतील संग्रहालये, वाचनालये आणि शैक्षणिक संस्था यांना भेटी देण्यात येतात. केंब्रिज विद्यापीठ परिसरात पायी फेरफटका मारणे हा एक आनंददायी अनुभव असतो. त्यावेळी किंग्ज कॉलेज चॅपेलचे दर्शन घडविले जाते. त्याचबरोबर ॲलन टुरिंग रूम्सचे देखील दर्शन घडविले जाते. ॲलन या कॉलेजचा विद्यार्थी होता. त्याचा सन्मान करण्यासाठी कॉलेजच्या एका विभागाला ॲलन टुरिंग रूम्स असे नाव दिले आहे. या खोल्या दाखवून या महान शास्त्रज्ञाच्या कामाची माहिती सहलीत सहभागी झालेल्या सर्वांना दिली जाते.



**ॲलन टुरिंग रूम्स**

**- डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा, वैभवनगरी,
कल्याण-शीळ रोड, काटई,
ता. कल्याण, जि. ठाणे - ४२१२०४

●●●

# बांडगुळे / लोरांथस

*'बांडगुळे / लोरांथस' या वनस्पतीची वैशिष्ट्ये, त्याचे उपयोग, त्याची देखभाल या बाबींवर या लेखात प्रकाश टाकला आहे - संपादक*

मित्रांनो, भारतीय समाजाला बांडगुळं ही काही नवीन नाहीत! पुरातन काळापासून भारतीय समाज अशा बांडगुळांना पोसत आला आहे!! कधी समाजाने खुशीने ही बांडगुळं आपल्या डोक्यावर बसवून घेतली आहेत. तर कधी या बांडगुळांनीच धर्मांच्या नावाखाली भारतीय समाजाच्या मानगुटीवर आपली मूळे पक्की केली आहेत. 'धार्मिक' बांडगुळं प्रत्येक देशात व प्रत्येक धर्मात आहेतच; पण भारतीय समाज ही बांडगुळं सोबत घेऊनच जन्माला येतो व सोबत घेऊनच मरतो! फार कमी लोक असे आहेत ज्यांनी ही बांडगुळं झुगारून दिली आहेत आणि सर्वार्थाने 'माणूस' म्हणून जगण्याचे धाडस त्यांनी दाखविले आहे. आम्ही धर्म आणि जात सोबत घेऊनच जन्मतो. तेव्हापासूनच हे धर्माचे ठेकेदार आमच्या पालकांच्या माध्यमातून आमचे शोषण सुरू करतात. हे शोषण मृत्यूनंतरही संपत नाही. दुसरी बांडगुळं म्हणजे स्वतःला आध्यात्मिक गुरू म्हणून घोषीत करणाऱ्यांना गुरूस्थानी मानून 'बाबा, बापू' म्हणून त्यांची मनोभावे पूजा करणाऱ्यांनी ह्या गुरूंना स्वतःच्या मानगुटीवर बसवून घेतलेले असते. त्यांनी चालविलेले शोषण ह्या निर्बुद्धांना कळतही नाही. पुण्य मिळाल्याच्या भ्रमात स्वतःचा व कुटुंबीयांचा छळवाद मांडणाऱ्या या भक्त मंडळींची कीव कराविशी वाटते. वनस्पतीमध्ये देखील अशीच बांडगुळं आहेत, जी ज्या झाडांच्या अथवा वनस्पतींच्या अंगाखांद्यांवर वाढून त्यांचेच शोषण करीत ही स्वतःची प्रजा वाढवित असतात. लोरांथस ही बांडगुळाचीच एक जात. १ ते ३ मीटर लांब वाढणारी व झाडांचे शोषण करणारी. हिचे शास्त्रीय नाव आहे Dendrophthoe Falcata.



हे बांडगुळ जुन्या व भेगाळलेली साल असलेल्या झाडावर जलद वाढते. विशेषतः आंब्याच्या झाडावर ही बांडगुळे अधिक प्रमाणात दिसतात. या बांडगुळाची मुळे फांद्यांच्या सालीमधून आत शिरून पाणी व उपयुक्त जीव-रसायने शोषून घेऊन स्वतःचे पोषण करतात. या बांडगुळांची वाढ फार झपाट्याने होत असते. यांच्या वाढीसाठी लागणाऱ्या पाण्यामुळे इतर घटक द्रव्यांचा

झाडांना होणारा पुरवठा हा त्यामुळे आपोआपच कमी होतो व परिणामी झाड मरते.

या बांडगुळाची पाने ३ ते ७ सें. मी. लांबीची लंब गोलाकृती असतात. एकांतरीत प्रकारची ही पाने फांद्याच्या शेंड्याकडे गर्दी करून असतात. या झाडास ३ ते ५ सें. मी. लांबीची नळीच्या आकाराची लांबोळकी फुले येतात. लाल किंवा पिवळ्या नळीच्या तोंडाशी हिरव्या रंगाची झाकणवजा टोपी असते. १ ते १.५ सें. मी. लांबीची ही टोपी चार समान भागात विभागून पेल्याच्या तोंडाशी चार पाकळ्या मागे वळतात. या पाकळ्या बाहेरून हिरव्या दिसत असल्यातरी आतील कडा मात्र लालभडक रंगात रंगलेल्या असतात. पुंकेसराचे चार-पाच शिपाई सावधानच्या स्थितीत एकमेकांना बिलगून उभे असतात. ही फुले गुच्छामध्ये येत असल्याने लांबूनच आपले लक्ष वेधून घेतात. रंगही मोहक असल्याने फुलपाखरांना तसेच पक्ष्यांना सहज आकर्षित करून घेतात व त्यांच्याद्वारे परागीकरण घडवून आणतात.

या बांडगुळांना लालपिवळ्या रंगाची गोल छोटी फळे येतात. ही फळे पक्ष्यांना खूप आवडतात. मात्र फळांच्या आतील चिकट गरामुळे फळांमध्ये असलेली एकमेव बी पक्ष्यांच्या चोचीस चिकटते. ही बी सोडविण्यासाठी पक्षी आपली चोच झाडाच्या फांदीवर घासतात. तेथे ही बी चिपकून नवीन झाडाची निर्मिती होते किंवा पक्ष्यांच्या विष्ठेद्वारे देखील या झाडांचा प्रसार होत असतो.

बांडगुळे झाडास हानिकारक असली तरी त्यामध्ये बरेच औषधी गुण आहेत. मानसिक ताण, तसेच अतिरीक्त रक्तदाब यावर पारंपरिक इलाज म्हणून याचा वापर होतो. रक्तवाहिन्यांचे कार्य सुकर करणे या वनस्पतीमुळे शक्य होते. यात पुरेशा प्रमाणात अँटीऑक्सीडंट द्रव्ये असतात. आतड्यांच्या काही विकारांतही याचा उपयोग होतो असे दिसून आले आहे. यावर अधिक संशोधन चालू आहे. अर्थात उपचार हा तज्ज्ञांचा विषय असल्याने, त्यांच्याच सल्ल्याने उपचार करणे योग्य.

बांडगुळे ज्या झाडावर येतात त्या झाडांचे नुकसान होऊ नये म्हणून बांडगुळे असलेल्या फांद्या कापून त्या लगेच नष्ट करतात. त्यामुळे बांडगुळांची वाढ होत नाही. या बांडगुळांचा औषधासाठी तरी उपयोग होतो. पण समाजातील बांडगुळांचे काय? त्यांना तर समाज अगदी डोक्यावर घेऊन नाचतो. त्यांचे मठ स्थापन करण्यास समाजच पैसा पुरवितो! आता तर या बांडगुळांच्या वाढीसाठी फारच पोषक वातावरण तयार झाले आहे. त्यामुळे आता बांडगुळांची शेती (!) अधिकृतपणे केली जाते की काय अशी भीती विचारवंतांना सतावत आहे...

**- प्रकाश दुधाळकर**
एफ-२२, नीता अपार्टमेंट,
मिठागर-नवघर लिंक रोड,
मुलुंड (पू.), मुंबई - ८१.
दूरध्वनी : २१६३ ६०५२
भ्रमणध्वनी - ९८६९५४१९६६

●●●

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**

# क्योंकी...अपना टाइम आयेगा!!

*कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आणि लॉकडाऊनच्या जंजाळात प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे आपण सर्वजण अनेक शारीरिक व मानसिक स्थित्यंतरातून जात आहोत. या प्रसंगी वस्त्रांची भावना व मानसिकता यांचा विचार या लेखात दिला आहे - संपादक*

घरातील सगळी कामे आटोपून दुपारी जरा निवांत पहुडले होते. पेपर वाचता वाचता केव्हा डोळा लागला कळलंच नाही. बाजूलाच असलेल्या कपाटातून काहीतरी कुजबूज कानावर पडली आणि जाग आली. आता कुजबूज संवाद स्वरुपात ऐकू येऊ लागली.

कोण बोलतंय? कुणाबद्दल? कशाबद्दल? स्त्रीसुलभ कुतूहलाने नीट कान देऊन ऐकू लागले.

'बरंय बाई तुम्हाला, निदान संक्रांतीच्या आणि हळदी कुंकवाच्या निमित्ताने ह्या वर्षी मिरवायला तरी मिळालं, आमचं मेलं नशिबच फुटकं!!'

'हो ना! नेहमीप्रमाणे वर्ष सुरू झाल्यावर, कपाटातून बाहेर पडून, घडीतून सुटून, गाडीमध्ये बसून, सगळीकडे छान मिरवून, विविध ठिकाणी फोटोमध्ये चमकून घेण्याचे आमचे सगळे मनसुबे मोडून गेले. त्या कोरोनाने आपली सुद्धा संचारबंदी करून टाकली अगदी!!' रडवेला स्वर आणखीनच रडवेला झाला.

मला आता तक्रारीचा सूर स्पष्टपणे जाणवत होता. एव्हाना माझ्या लक्षात यायला लागलं होतं की, बंद कपाटातील हे संवाद माणसांमधील नसून चक्क माझ्या साड्यांचे आहेत! आणि त्या सुद्धा आपली कैफियत मांडत आहेत. बरं! बरं! माझ्यासाठी अजबच होतं हे!! पण अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या वातावरणात त्यांनाही व्यक्त होण्याचा अधिकार आहे हे लक्षात येताच, मी सुद्धा काहीही आवाज न करता पलंगावर गुपचूप पडून त्यांच्या संवादांवर लक्ष केंद्रित केले.

'नाहीतर काय? फेब्रुवारी महिन्यात हिने आमचा गठ्ठा कपाटात पुढे रचून ठेवला होता. उन्हाळ्याच्या दिवसात दरवर्षी आम्ही हिच्या टॉपलिस्टवर असतो. आमचे शीतल सोबर रंग, आमच्या मऊसूत कापडाचा प्रकार, आमची धाटणी, आमची बातच काही और! अंगावर नेसल्यावर जो काही फील येतो ना! अहाहा!' थोड्याशा गुर्मीत कॉटनच्या साड्या भगिनी बोलत होत्या.

'अग, पण उपयोग काय? तुमचं ह्या सीजनचं फिरणं, मिरवणं गेलं. बसा आता वर्षभर घडीत.!' सिल्कच्या साड्या त्यांच्या साडी कवरमधून बाहेर डोकावून बोलत होत्या.

थोड्याशा घुश्श्यात कांजीवरम म्हणाली, ''ह्या वर्षीचा लग्नाचा मोसम सुरू झाल्यानंतर मला तर कोण आनंद झाला होता! हिला तर लागोपाठ अनेक लग्न, साखरपुडे, वास्तुशांती, मुंजीना हजेरी लावायची होती. कपाट उघडून हिने लेकीला सांगताना आम्ही ऐकलेही होते. 'ह्यावर्षी मार्च महिन्यापासून ते अगदी पाऊस सुरू होईपर्यंत सगळ्या मंगल कार्यांसाठी एकेक साडी नेसणार आहे.''

ह्यावर लगेचच 'हो हो!! अगदी बरोबर!!' म्हणत धर्मावरम, पटोला, बनारसी, प्युअर सिल्क सगळ्या जणींनी कांजीवरमची री ओढली.

'हो ना! नाहीतर काय? आपण एवढ्या मोठ्या, संपन्न घरच्या, अनेक कुशल कारागीर त्यांच्या अपार मेहनतीतून आपल्याला साकारतात. आपल्याला विकत

घेताना दहा वेळा विचार करतात, ट्रायल घेतात, दुकानातून बाहेर पडून सुद्धा आपण मनात भरल्यामुळे पुन्हा आपल्यासाठी त्याच दुकानात येतात. एव्हढंच नव्हे तर आपल्या सौंदर्याचे किस्से कित्ती कित्ती जणींशी शेअर करतात. परंतु म्हणतात ना, नव्याची नवलाई!! तसं काही दिवसांनी आपलं प्रेम कमी होऊ लागतं आणि मग दुसरीच कोणतीतरी नवीन प्रकारची साडी मनात भरू लागते आणि मग बघताबघता आपलं अर्ध्याहून अधिक आयुष्य ह्या बंद कपाटातल्या बंद साडी फोल्डर मध्येच जातं. हं....! असो!! पण आताशा कुठे जरा मोकळा श्वास घेणार होतो, मिरवणार होतो, वर्षभराची राहिलेली कसर भरून काढणार होतो, पण छे!! कसलं काय! ती मंगलकार्यही राहिली आणि आपल्याला नेसून मिरवणारी ही घरातच अडकली.' पेशवाईने एका दमात स्वतःच्या भावनांना वाट करून दिली.

आता मात्र, केव्हापासून शांत असलेल्या, बहुजन प्रकारात मोडणाऱ्यांचा (यात कोटा, पावसाळ्यात उपयुक्त अशा गार्डन कुटुंबाच्या सदस्य आणि इतर) आवाज ऐकू आला. 'अग सख्यांनो, आता आम्हालासुद्धा बोलण्याची संधी द्या. दुर्दैवाने तुमच्या सगळ्या जणींच्या बाहेर पडायच्या संधी हुकल्या. परंतु आम्ही काय करायचं? बहरायचा, बागडायचा हा आमचा मोसम!! त्या पावसाने जरी आडव्या तिडव्या सरींनी चिंब भिजवलं तरीही काही मिनिटांतच सुकून हलक्या फुलक्या होण्याचा आमचा गुणधर्म! अगदी जून महिन्यापासून सप्टेंबरपर्यंत आम्ही फूल डिमांडमध्ये असतो. पण...!!' एक दीर्घ श्वास सोडत आवाज तिथेच अडखळला.

'अग, पण.. पण काय?...' कुणीतरी आतुरतेने विचारल्यावर, त्या म्हणाल्या, 'सध्याची परिस्थिती पाहता, आमचाही सीजन बहुधा कोरडाच जाणार असं वाटतंय.' हिरमुसलेला स्वर आता अगदी स्पष्ट जाणवू लागला.

एव्हढ्यात; 'हमारी मांगे पूरी करो. आम्हाला पण न्याय द्या.' जोरदार घोषणांचा आवाज सगळीकडे घुमू लागला. 'आमचं काय? सांगा आम्ही काय करायचं? वाढदिवसाला, लक्ष्मीपूजनाच्या निमित्ताने, भाऊबीजेची, सेलमध्ये, सहज म्हणून मैत्रिणीने आणलेली अशा आम्ही अनेक जणी साध्या पिशवीमधून सुद्धा बाहेर यायला न मिळाल्याने प्रचंड वैतागलेल्या आहोत. आम्ही तर फक्त अमुक दिवशी हिची घडी मोडीन, तमुक वर तसा ब्लाऊज शिवीन एव्हढंच ऐकलंय. बस्स!! ह्यापुढे आमचं काहीच झालं नाही.' इतर साड्यांनी तक्रार केली.

अरे! बापरे!! वातावरण प्रचंड तापले होते. सगळीकडे एकदम शांतता पसरली. आणि मी स्तब्ध झाले होते. काय करावं काहीच सुचेना. लॉकडाऊनच्या नियमांचे पालन करताना अनवधानाने आपल्या हातून चूक होतेय की काय? असहिष्णू, भावनाशून्य , कृतघ्न, बेपर्वा अशा अनेक (कु) विशेषणांनी माझ्या समोर फेर धरून नाचायला सुरुवात केली.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आणि लॉकडाऊनच्या जंजाळात प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे आपण सर्वजण अनेक शारीरिक व मानसिक स्थित्यंतरातून जात आहोत. कुणी बदल स्वीकारत आहेत, कुणी धडपडत आहेत, तर कुणी पडत आहेत... मग ह्या बापड्या वस्त्रांचे काय? त्यांच्या भावना, त्यांची मानसिकता? ..विचारांच्या गुंत्यात मी गुरफटून जात असताना एक धीरगंभीर, परिपक्व, शांत आवाज कानी पडला –

'सख्यांनो, थोडं शांत व्हा बरं!! आणि आता मी काय सांगतेय ते नीट लक्ष देऊन ऐका. बघा! बदल हा तर सृष्टीचा नियम आहे. जे आज आहे ते उद्या नक्कीच वेगळं असेल. थोडा धीर धरा. तुम्हा सगळ्यांची कैफियत मी समजू शकते. हे थोडं विरलेलं, किंचित रंग उडालेलं,

माझं रूप तुमच्यापेक्षा अनेक पावसाळे, अनेक सण-समारंभ जास्त अनुभवल्याची साक्ष देणार आहे बरं का!! त्याच अनुभवांच्या जोरावर आणि वडिलकीच्या नात्याने सांगते, अशा छोट्या छोट्या प्रसंगांनी रुसून बसू नका, घाबरून जाऊ नका. चिडचीड, नैराश्य, भीती ह्या रिपूंनी त्या माणसांच्या जगात खूप विजय मिळवला आहे, आणि एकदा का त्यांना आपल्या जगात प्रवेश मिळाला की मग आपण संपलोच समजा. तेव्हा 'श्रद्धा आणि सबुरी!' हेच आपले वचन आणि हाच आपला जीवनमंत्र! मी माझ्या तारुण्यात, माझ्या मालकिणीच्या तोंडून बऱ्याचदा ऐकलेल्या एका छान गाण्याच्या दोन ओळी तुम्हाला ऐकवते, 'आनेवाला पल जानेवाला है! हो सके तो इसमें जिंदगी बिता दो, पल जो ये जानेवाला है!' समजलं ना! तेव्हा मैत्रिणींनो, अशा सद्य परिस्थितीचाही अनुभव आपण घेऊ आणि त्यातूनही समृद्ध होऊ. क्यों की. ...क्यों की.. अपना टाइम आयेगा...!!' वाक्य संपेपर्यंत टाळ्यांचा कडकडाट ऐकू येऊ लागला.

कोणाचा आवाज असेल बरं तो? इतका आत्मविश्वास आणि समतोल, बोलण्यात, वागण्यात. विचार करायची गरजच भासली नाही... अनेक अनुभव गाठीशी असलेल्या, नात्यांचे अनेक पदर, स्वतःच्या पदराने मायेने जपलेल्या, अनेकींना आपल्या सहवासाच्या उबेने न्हाऊमाखू घालणाऱ्या, वयोमानाप्रमाणे वार्धक्याकडे झुकलेल्या तरीही घरंदाजपणाची, ऐश्वर्याची लक्षणे अंगावर मिरवणाऱ्या आणि अनेक पिढ्यांना सोबत करणाऱ्या माझ्या आजीच्या हिरव्यागार रंगाच्या पैठणीचे स्वर होते ते...!! खरंच..!! तिच्या समृद्ध आणि अनुभवसंपन्न विचारांना माझा त्रिवार सलाम!!

**- डॉ. सौ. अर्चना केदार प्रभुदेसाई**

•••

(पृष्ठ क्र. १६ वरून - **आषाढस्य प्रथम दिवसे : महाकवी कालिदासदिना निमित्ताने**)

भोग व त्याग, शृंगार व वैराग्य, काम व मोक्ष यांचा सुरेख समन्वय कालिदास साधतो. डॉ. के. ना. वाटवे यांनी म्हटल्याप्रमाणं वाल्मीकीच्या नीतीला आणि व्यासांच्या बुद्धीला कालिदासाने सौंदर्याची जोड दिली. व्यासांनी सत्य, वाल्मीकीने शिव, तर कालिदासाने सौंदर्य यांची प्रचीती प्रामुख्याने दिली. 'व्यास, वाल्मीकी आणि कालिदास यांच्यात भारतीय संस्कृतीचं सार साठवलेलं आहे' असं महर्षी अरविंद म्हणतात ते याचसाठी.

सध्याच्या राजकीय अस्थिरतेच्या व विघटनवादी प्रवृत्तींच्या वाढीच्या या काळात भारताच्या सांस्कृतिक एकात्मतेचे एक प्रतीक म्हणून कालिदास महत्त्वपूर्ण आहे. भारताच्या बहुतांशी भागांची वर्णनं त्याच्या साहित्यात आढळतात. भारतीय संस्कृतीचे म्हणून जे आदर्श आहेत ते कालिदासाने अभिव्यक्त केले आहेत व म्हणूनच केरळ पासून काश्मीर पर्यंत सर्वांनाच कालिदास पूज्य वाटतो. 'आपला' वाटतो.

**- डॉ. प्रशांत धर्माधिकारी**
इंग्रजी विभाग,
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे
भ्रमणध्वनी - ९४२२४९५०९४

•••

*दिशा संपर्क दूरध्वनी*
**०२२-२५४२ ६२७०**

# तीन दिवस ४५० किलोमीटर अंतर : एक समृद्ध करणारा सायकल सफरीचा अनुभव

*सायकल सफरीचा अनुभव या लेखात विशद केला आहे - संपादक*

बुधवार दिनांक १९ फेब्रुवारी (शिवजयंती) ते शुक्रवार दिनांक २१ फेब्रुवारी (महाशिवरात्री)२०२० असे तीन दिवस माझे सायकल मित्र मिलिंद गोगटे यांच्यासह ठाणे-सिन्नर-कोपरगाव-शिर्डी-येवला-मनमाड-कुंदलगाव-मालेगाव-चांदवड-नाशिक-ठाणे असे पूर्वनियोजित सायकल-पर्यटन केले. या तीन दिवसांत ४५० कि.मी. सायकलिंग केले. सुट्टी जास्त नसल्याने फक्त तीन दिवसांचे नियोजन केले होते. वेळ वाचवून व उन्हाची वेळ टाळून जास्तीत जास्त ठिकाणी पोहोचणे आणि त्यासाठी सकाळी ५ वाजता सायकलिंगला सुरुवात करणे एवढे नक्की केले. प्रत्येक दिवशी सरासरी १५० कि.मी. सायकलिंग करणे शक्य असल्याने जातांना ठाणे-कसारा व परत येताना कसारा-ठाणे लोकल ट्रेन मध्ये सायकली घेऊन जायचे व यायचे असे नियोजन केले.

बुधवारी सकाळी पहिल्या कसारा ट्रेनमध्ये सायकलींसह कळवा येथून सकाळी सव्वापाच वाजता आम्ही प्रवास सुरू केला व कसारा स्टेशन ऐवजी महामार्गानजीक असलेल्या उंबरमाळी स्टेशनला ७ वाजता उतरलो व सायकलिंग सुरू केले. एक तासानंतर कसारा घाटाच्या पायथ्याशी पोहोचलो. चहा नास्ता करून नंतर ४० मिनिटांत कसारा घाट पार केला. घाटाचा ७७४ मीटरचा चढ पार केल्यानंतर पाणी पिण्यासाठी घाटनदेवी मंदिरात थांबलो व दर्शन घेतले. इगतपुरी व घोटी पार करून सकाळी १० च्या दरम्यान घोटी-सिन्नर रोडने सिन्नरकडे प्रवास सुरू केला. थोडे अंतर गेल्यानंतर लक्षात आले की, रस्त्याची अवस्था अतिशय वाईट आहे. ५५ किलोमीटर अंतरावर असलेल्या सिन्नरला दुपारच्या जेवणापूर्वी १ वाजेपर्यंत पोहोचण्याच्या प्रयत्नात निघालो. पण रस्त्यात जास्तच खड्डे असल्याने आणि सायकलला असलेले बरोबरचे सामान अंदाजे १५ किलो असल्याने माझे सहकारी मिलिंद गोगटे याच्या सायकलचे कॅरिअर तुटले व सायकल पुढे चालवणे शक्य होईना. त्यामुळे गती थांबली व रस्त्यात वेल्डिंग दुकानाचा शोध सुरू केला. साधारणतः ७ कि.मी. अंतरावर एक वेल्डिंगचे दुकान मिळाले व सुदैवाने अतिशय कौशल्यपूर्वक काम करणारा वेल्डर तिथे असल्याने १० मिनिटात नवी पट्टी जोडून कॅरिअर दुरुस्त करून मिळाले. तोपर्यंत ११.३० वाजले होते व उन्हाचा चटका वाढला होता आणि सिन्नर अजून ४० कि.मी. अंतरावर होते. सिन्नरला दुपारचे जेवण करून तेथून ८ किलोमीटर अंतरावर असलेल्या डुबेर गावी जाऊन थोरले बाजीराव पेशवे यांचे जन्मस्थान असलेला 'बर्वे वाडा' पाहून व सिन्नर जवळील गोंदेश्वराचे दर्शन घेऊन पुढे जायचे होते. त्यामुळे जास्तीत जास्त गतीने सायकल चालवून लवकरात लवकर सिन्नरला पोहोचणे गरजेचे होते. ऊन प्रचंड असल्याने व सायकलची गती वाढवल्याने डि-हायड्रेशनची भीती होती म्हणून सोबत घेतलेले इलेक्टरल मध्ये मध्ये थांबून घेतले. सिन्नरपर्यंत तीन ठिकाणी ब्रेक घेऊन दुपारी २.३० वाजता सिन्नरला पोहोचलो. सिन्नर १० कि.मी. असतानाच प्रा. चंद्रशेखर बर्वे यांचा फोन आला. ते जेवणासाठी संस्कृती हॉटेलवर आमची वाट पाहात होते. थोरले बाजीराव पेशवे ज्या वाड्यात जन्मले त्या

वाड्याचे वारसा हक्काने मालक असलेले प्रा. चंद्रशेखर बर्वे हे अतिशय साधेपणा जपणारे, स्वतः सायकालिस्ट असलेले, मनमिळाऊ, वागण्या बोलण्यात कुठलाही बडेजाव नसलेले एक अभ्यासू व्यक्तिमत्त्व. गेली अनेक वर्षे ते न चुकता सायकलने पंढरपूरची वारी करतात. मागच्याच महिन्यात पानिपत ते नाशिक अशी १५०० किलोमीटरची सायकलिंग त्यांनी ९ दिवसात पूर्ण केली. सायकलिंग हा एक वेगळा असा समान धागा असल्याने त्यांनी एक सायकलिस्ट म्हणून आमचे मन:पूर्वक स्वागत केले. आम्हांला पुढे शिर्डीला त्याच दिवशी पोहोचायचे असल्याने आणि हे अंतर ६० कि.मी. असल्याची माहिती असल्याने बर्वे सरांनी पुढील दीड तासाचे नियोजन केले. जेवण करून सायकली हॉटेलला ठेवून त्यांच्या कारने आम्ही डुबेरला थोरले बाजीराव पेशवे यांचे जन्मस्थान असलेला 'बर्वे वाडा' पाहण्यासाठी निघालो. वाड्याकडे जाण्याआधी गाडीत बसल्याबरोबर ८ किलोमीटर प्रवासात बर्वे सरांनी गावाविषयी व पंचक्रोशीविषयी माहिती दिली. यामध्ये गावाची रचना, लोकसंख्या, आजूबाजूचे किल्ले, डुबेरगड, पट्टा किल्ला, विश्रामगड इत्यादींविषयी वर्णन होते. हे वर्णन संपण्याच्या आत आम्ही डुबेरला पोहोचलो.

डुबेरे हे गाव सिन्नरच्या दक्षिणेला सात किलोमीटर अंतरावर आहे. एका बाजूला औंढापट्ट्यांची रांग व दुसऱ्या बाजूला सप्तशृंगी देवीचे मंदिर असलेला डुबेर डोंगर. त्या डोंगर पायथ्याशी दाट झाडीत डुबलेले गाव म्हणून गावाचे डुबेरे हे नाव. त्या परिसरात अजूनही पेशवेकालीन बैठी व दुमजली घरे आहेत. डुबेरे गावातील मुख्य गल्ल्या व बोळ; अरुंद रस्ते एकमेकांना समांतर व काटकोनात छेदणारे आहेत, हे विशेष. बर्वेवाडा गावाच्या मध्यभागी आहे. ३२३ वर्षांपूर्वी हा वाडा बांधला असल्याचे बर्वे सरांनी सांगितले. वाड्याचे बांधकाम भक्कम आहे. ते चपट्या विटा व चिरेबंद घडीव दगड यांनी केलेले आहे. वाड्याला चहुबाजूंनी तटबंदी आहे. वाड्यास एक टेहळणी बुरूज आहे. त्या बुरूजावरून गावाचा पूर्ण परिसर नजरेत भरतो. या वाड्याची रचना समजावून सांगतानाच संपूर्ण वाडा बर्वे सरांनी सोबत फिरून दाखवला आणि माहिती दिली. थोरले बाजीराव पेशवे याचेविषयी देखील माहिती सांगितली. काही महिन्यांपूर्वीपर्यंत बर्वेसरांचे या वाड्यात सहकुटुंब वास्तव्य होते. सध्या कामानिमित्त ते सिन्नरला राहतात. पण वाड्याशी असलेली बांधिलकी त्यांनी जपलेय. नियमित साफसफाई बरोबरच वाड्याची आवश्यक ती काळजी बर्वे सर घेतात. वाड्याविषयी सविस्तर माहिती सांगून झाल्यानंतर वाड्याच्या बुरूजावर आम्हाला घेऊन गेले व सभोवतालच्या परिसराची भौगोलिक माहिती दिली आणि काही फोटो सुद्धा काढले. त्यानंतर गावातील सटवाईच्या मंदिराला भेट दिली. त्याचबरोबर गावात असलेले २०० वर्ष जुने व अतिशय दुर्मीळ असे भोपळ्याचे झाड दाखवले व त्याविषयीची रंजक आणि शास्त्रीय माहिती सांगितली. डुबेर भेट आटोपून बर्वे सरांनी आम्हाला ४ वाजता निरोप दिला. आम्ही सिन्नर मधील दुसरे महत्त्वाचे ठिकाण गोंदेश्वर मंदिराकडे सायकल वरुन निघालो व ४.३० वाजता मंदिरात पोहोचलो.

सिन्नर येथील गोंदेश्वर मंदिर हे सिन्नर या तालुक्याच्या गावी असलेले महादेवाचे मंदिर आहे. पुरातन भूमीज स्थापत्यशैली बांधकामाचा उत्तम नमुना असलेले हे मंदिर १२ व्या शतकात गवळी राजकुमार राजगोविंद याने बांधलेले आहे. हे मंदिर १२५ फूट X ९५ फूट आहे. हे मंदिर पाच मुख्य मंदिरांचा समूह असल्याने त्याला 'शैव पंचायतन' म्हटले जाते. यांतील गोंदेश्वराचे मुख्य शिवमंदिर मध्यावर असून सभोवतीची चार उपदिशांना असणारी मंदिरे पार्वती, गणपती, सूर्य आणि विष्णू यांची आहेत. मंदिरात सभामंडप व गाभारा

आहे. गर्भगृहावर बांधलेले, आकाशाकडे झेपावणारे मंदिराचे पटईचे शिखर अतिशय देखणे असून अप्रतिम कोरीव कामाने सजवलेले आहे. गर्भगृहात रेखीव शिवपिंडी आहे. घाईतच मंदिर भेट व दर्शन आटोपून सायंकाळी सव्वापाच वाजता ६० किलोमीटरवर असलेल्या कोपरगाव या माझ्या गावी नियोजित मुक्कामाच्या ठिकाणी जायला निघालो. कोपरगावला पोहोचण्यास रात्रीचे ८ वाजणार व बराच अंधार होणार असल्याने जास्तीत जास्त गतीने जावे लागणार होते. कोपरगाव हे माझे गाव असल्याने रस्ता माहितीचाच होता म्हणून अंधार असला तरी चालणार होते. अखेर साडे-सात वाजता एकूण १५० किलोमीटर सायकलिंग करून कोपरगावला माझ्याघरी पोहोचलो.

दुसऱ्या दिवशी लवकर उठून सकाळी ६ वाजता शिर्डीला जाऊन आलो. सलगच्या सुट्टीमुळे साईबाबांच्या दर्शनासाठी खूप गर्दी असल्याने मंदिराचे दूरदर्शन घेऊन आम्ही परत कोपरगावच्या घरी आलो व नास्ता करून मालेगाव मुक्कामी निघालो. दुपारचे जेवण मनमाड जवळील कुंदलगाव या बहिणीच्या गावी केले. शेतात असलेल्या वस्तीवर मस्तपैकी चुलीवरची बाजरीची भाकरी, गावरान वांग्याची भाजी आणि सोबतीला मिरचीचा ठेचा असा जेवणाचा जोरदार बेत होता. जेवण करून शेतात फेरफटका मारला. सर्व पिकांची माहिती घेतली. भाच्याने शेततळ्यात केलेल्या मत्स्यशेतीच्या प्रयोगाची माहिती घेतली. तळ्यात असलेले रोहू त्याचबरोबर कटला या प्रकारातील मासे पाहायला मिळाले. माझ्यासोबत असेलेल्या श्री. गोगटे यांनी शेतात येथेच्छ फोटोग्राफी केली आणि आठवणी त्यांच्या कॅमेऱ्यात टिपल्या. कुंदल गावला एक तास विश्रांती घेऊन साडे-चारला मालेगावला जायला निघालो. कुंदलगाव ते मालेगाव उताराचा रस्ता असल्याने सव्वा तासातच मालेगाव गाठता आले. मालेगाव जवळ पोहोचताच मित्र डॉ. शंकर कदम यांचा फोन आला व त्यांनी मालेगावातील राष्ट्रीय एकात्मता चौकात ते आमची वाट पाहात असल्याचे सांगितले. तिथे पोहोचताच आम्ही आश्चर्यचकित झालो. डॉ. शंकर कदम, डॉ. राजेश निकम, वाघ सर हे त्यांच्या मित्रांसह व मालेगावातील काही सायकल मित्रांसह-ज्यामध्ये मालेगाव महानगरपालिकेचे दोन विद्यमान नगरसेवक सुद्धा होते- आमच्या स्वागतासाठी हजर होते. त्यांना ठाण्याहून सायकलने आल्याचे अप्रूप वाटत होते. भर रस्त्यात असलेल्या मोठ्या चौकात त्यांनी आमचा पुष्पगुच्छ आणि शाल देऊन सत्कार केला. फोटोग्राफरसुद्धा हे क्षण टिपण्यासाठी सज्ज ठेवले होते. मला हा सत्कार म्हणजे आपल्या मित्रांनी केलेला आमचा कौतुक सोहळा वाटला. सत्कार आटोपल्यानंतर गेस्ट हाऊसला मुक्कामाच्या ठिकाणी ते आम्हास घेऊन गेले. सर्वांसोबत सायकलिंगच्या गप्पा आणि अनुभवांची देवाण-घेवाण झाली. अंघोळ करून फ्रेश होऊन सर्वांनी एकत्र चहा घेतला. रात्री लवकर जेवण आटोपून सकाळी साडे-पाचला निघण्याच्या नियोजनासोबत झोपी गेलो.

दिनांक २१ फेब्रुवारी, तिसऱ्या दिवशी मालेगाव ते थेट ठाणे असा प्रवास असल्याने आणि हे अंतर २५० कि.मी. पेक्षा जास्त असल्याने १८० किलोमीटरवर असलेल्या कसारा स्टेशनपर्यंत सायकलिंग करून जाण्याचे नियोजन केले. रात्री आठ वाजेपर्यंत कसारा घाट पार करून रात्री ९ वाजताच्या कसारा ट्रेनने ठाण्याला जायचे ठरवून साडे-पाच वाजता मालेगावहून सायकलिंग सुरू केले. मालेगाव- चांदवड-नाशिक-कसारा असा १८० किलोमीटरचा प्रवास होता. त्यातील मालेगाव ते चांदवड हा ४५ किलोमीटरचा टप्पा सायकलिंगसाठी थोडा कठीण असा होता. यामध्ये मुंबई-आग्रा हायवे वरचा चांदवड तालुक्यात तीव्र चढाव असलेला आणि तीव्र वळणे असल्याने धोकादायक ठरलेल्या राहुड घाटातील रस्ता होता. हा रस्ता सहा पदरी करण्यात आला असल्याने

रुंदीकरणात अनेक वळणे गेली असली तरी घाटाचा बाज कमी झालेला नाही. त्यामुळे कठडे, फलक, रॅम्बलर अशा महत्त्वपूर्ण सुविधा असूनही हा घाट धोकादायक मानला जातो. जवळजवळ ८०० मीटर कठीण चढ असलेला घाट रस्ता पार करून आम्ही ८ वाजता चांदवडला पोहोचलो. चांदवडला ग्रंथपाल असलेला मित्र दिलीप घोगरे आमची नाश्त्यासाठी वाट पाहात होता. महाशिवरात्रीच्या उपवासाचा विचार न करता येथेच्छ नास्ता केला आणि ९ वाजता नाशिककडे प्रस्थान केले. चांदवडपासून ६४ किलोमीटर अंतर पार करून दुपारच्या जेवणासाठी नाशिकला एक वाजता माझ्या काकांच्या घरी पोहोचलो. एअर इंडियातून यंत्र अभियंता म्हणून निवृत्त झालेले, आणि सध्या नाशिकमध्ये संघाच्या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रमांचा भाग असलेले ६५ वर्षीय काका स्वतः सायकल दररोज वापरत असल्याने त्यांनी आमचे अतिशय आपुलकीने स्वागत केले. मालेगाव ते नाशिक १०७ किलोमीटरचा सायकल प्रवास सकाळी साडे-पाच पासून केल्याने थोडा थकवा जाणवत होता म्हणून नाशिकला पोहोचताच अंघोळ करून जेवण केले आणि मी थोडी विश्रांती घेतली व माझे सहकारी श्री. गोगटे यांनी काकांनी केलेले बंगल्याचे व बागेचे नियोजन पाहात आणि काकांशी गप्पा मारत फोटोग्राफी करणे पसंत केले. नाशिकला थांबलो होतो तिथून कसारा रेल्वे स्टेशन ७० किलोमीटर असल्याने अंधार होण्याचा विचार करून चार वाजता कसाऱ्याला जाण्यासाठी निघालो. घोटीपर्यंत बऱ्यापैकी चढ असल्याने हवा तसा वेग घेता येत नव्हता. साडे-सात वाजण्याच्या सुमारास अंधार पडल्यानंतर कसारा घाटात पोहोचलो. पण पूर्ण उतार असल्याने लवकरच घाट उतरून फूडपॉइंट हॉटेलला आठ वाजता पोहोचलो व जेवणाला पर्याय होईल असे खाऊन घेतले. कसारा लोकल ट्रेनचे वेळापत्रक तपासून ९.२१ च्या कसारा गाडीने जायचे ठरवून कसारा स्टेशनवर पोहोचलो. स्टेशनवर श्री. गोगटे यांच्या लक्षात आले की, ही जलद गाडी आहे. त्यामुळे कळवा किंवा मुंब्राला उतरता येणार नाही. मग आम्ही शहाडला उतरून नंतर लगेचच असलेल्या टिटवाळा गाडीने मुंब्राला उतरलो आणि सायकलिंग करीत रात्री ११.३० वाजता सायकलिंग पर्यटनाच्या संपन्न अनुभवासह घरी परतलो. शेवटच्या दिवसाची सायकलिंग १८० किलोमीटर झाली होती. पण या पर्यटनाने खूप चांगला अनुभव दिला, खूप लोकांना भेटता आले, सायकलिंगचे फायदे लोकांना सांगता आले. पन्नाशीच्या पुढील दोन 'तरुण' एवढा सायकल प्रवास करू शकतात तर आपण का सुरू करू नये असा विचार काही लोकांनी बोलून दाखवला सुद्धा! विशेषतः माझ्यासोबतचे मिलिंद गोगटे ५८ वर्षांचे आहेत व त्यांना मधुमेह असल्याचे काही वर्षांपूर्वी निदान झालेले असतानाही त्यांनी नियमित सायकलिंगने मधुमेह सुद्धा पळवून लावला व अनेकदा तपासण्या करून डॉक्टरांनी त्यांना मधुमेहासाठी कोणत्याही औषधाची गरज नसल्याचे सांगितल्याचा अनुभव त्यांनी लोकांना सांगितला. काहींनी, 'आता आम्ही निदान १५ किलोमीटर तरी सायकल नियमित चालवू' असा शब्द सुद्धा आम्हाला दिला. या सर्व प्रवासात अनेकदा लोक स्वतः हून संवाद साधत होते. थांबवून चौकशी करत होते, चहापाणी घेणार का अशी विचारणाही काही लोकांनी केली. प्रवासात कारचालक, दुचाकी स्वार स्वतःहून रस्ता देत होते. असा एकंदर खूप चांगला अनुभव आला. पण फक्त सायकलने दूरचा प्रवास करणाऱ्याचे कौतुक करण्यापूरता उत्साह न दाखवता, लोकांनी स्वतः सायकलचा दैनंदिन वापर करावा अशी माफक अपेक्षा आम्ही ठेवून आहोत.

**- प्रा. नारायण बारसे**
ग्रंथपाल,
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे

नास्तीकपणा हा फक्त माणसाच्या ओठावर असतो, तो त्याच्या मनात नसतो!

# परिसर वार्ता

**- संकलित**

## जोशी–बेडेकर महाविद्यालय

**प्रा. डॉ. दीपक साबळे यांची इंडियन इकोनोमिक असोसिएशनमध्ये निवड.**

ठाण्यातील वि.प्र.मं.च्या जोशी–बेडेकर महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. दीपक साबळे यांची राष्ट्रीय स्तरावरील अर्थशास्त्रीय विषयाशी संबंधित असलेल्या इंडियन इकोनोमिक असोसिएशन (IEA) च्या कार्यकारणी समितीसाठी झालेल्या ऑनलाइन निवडणुकीमध्ये बिनविरोध निवड झाली आहे.त्यांची ही निवड पुढील तीन वर्षांसाठी असेल. भारतातून एकूण २३ जणांच्या कार्यकारणी समितीमध्ये स्थान मिळवणारे ठाण्यातील ते पहिले अर्थशास्त्री आहे.



प्रा. डॉ. दीपक साबळे हे अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून धुरा सांभाळण्या बरोबरच, ते नौदल एन. सी. सी. चे ऑफिसर आहेत. तसेच ते पदव्युत्तर एम. ए. व्यावसायिक अर्थशास्त्राचे समन्वयक सुद्धा असून महाविद्यालयातील व्यावसायिक अर्थशास्त्र संशोधन केंद्राचे प्रमुख आहेत आणि सध्या त्यांच्या हाताखाली पाच संशोधक मार्गदर्शन घेत आहेत. प्रा. डॉ. दीपक साबळे मुंबई विद्यापीठ व्यावसायिक अर्थशास्त्रच्या अभ्यास मंडळाचे सभासद आहेत. त्यांचे आतापर्यंत तीस पेक्षा जास्त शोध–निबंधांचे वाचन आणि प्रकाशन झाले असून पाच विविध प्रकारची प्रथम वर्ष ते अंतिम वर्ष अभ्यासक्रमावर आधारित क्रमिक पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

प्रा. डॉ. दीपक साबळे यांची राष्ट्रीय स्तरावरील इंडियन इकोनोमिक असोसिएशन (IEA) च्या कार्यकारणी समितीसाठी बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचे महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या बरोबरच ठाण्यातील सर्व स्तरावरून प्रा. डॉ. दीपक साबळे यांचे अभिनंदन केले जात आहे.

**भाषा ही जीवनमूल्यांचे संचित देते : पद्मश्री डॉ गणेश देवी**




ठाण्यातील विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी–बेडेकर महाविद्यालयातर्फे कै. डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमालेच्या २४ व्या व्याख्यानाचे पुष्प ज्येष्ठ भाषातज्ज्ञ व विद्वान साहित्यिक पद्मश्री डॉ. गणेश देवी यांनी गुंफले. भारतातील भाषांची विविधता व लोकशाही या विषयावर हे व्याख्यान झाले. कै. डॉ. वा ना. बेडेकर यांच्या जन्मशताब्दी प्रीत्यर्थ सुरू झालेली ही व्याख्यानमाला म्हणजे ठाण्यातील सांस्कृतिक अवकाशाची ओळख आहे.

भाषा रिसर्च फाऊंडेशन, आदिवासी अकॅडमी, तसेच पीपल्स लिंग्विस्टिक सर्व्हे ऑफ इंडिया या संस्थात्मक कामातून सर्वांना परिचित असलेले डॉ. गणेश देवी हे भाषांच्या संवर्धनाचे काम करतात. त्यांना त्यांच्या

'आफ्टर आम्नजिया' या पुस्तकासाठी साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळालेला आहे. तसेच, सार्क रायटर्स फाऊंडेशन अवॉर्ड, प्रिन्स क्लास अवॉर्ड व दुर्गा भागवत स्मृती पुरस्कार, महाराष्ट्र फाऊंडेशन पुरस्कार आदी पुरस्कार मिळाले आहेत.

व्याख्यानाच्या सुरुवातीला आपले मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक म्हणाल्या की, 'प्रत्येक जण आपल्या परीने विश्वामित्र सारखी प्रतिसृष्टी निर्माण करत असतो.' भाषेकडे पाहण्याची डोळस दृष्टी वृद्धिंगत होण्याची गरज डॉ. नाईक यांनी अधोरेखित केली. त्यांनी डॉ. गणेश देवी यांच्या कामाचा उल्लेख करत जमिनीवर राहून काम करण्याचे महत्त्व सांगितले. क्रियाशील राहून विद्वत्तेच्या व ज्ञानदानाच्या कामात हिरीरीने भाग शिक्षण क्षेत्रातील लोकांनी घ्यावा असा मानस त्यांनी व्यक्त केला. त्यानंतर डॉ. प्रशांत धर्माधिकारी यांनी डॉ. गणेश देवी यांच्या कार्याची सविस्तर ओळख करून दिली.

डॉ. गणेश देवी आपल्या व्याख्यानात म्हणाले की, 'समाजाला पर्यावरणाच्या ऱ्हासाची आता जाणीव झाली आहे. मात्र तशीच जाणीव भाषेच्या बाबतीतही करून द्यावी लागेल. येत्या दोनशे वर्षांत सर्व भाषा नष्ट होतील' असे ते म्हणाले. पुढील तीस ते चाळीस वर्षांत जगातील सहा हजार पैकी चार हजार भाषा नष्ट होण्याच्या मार्गावर असून, भारतातील सहाशे भाषांचा त्यात समावेश आहे. भाषा नष्ट झाल्यावर एक अत्यंत महत्त्वाचा वैचारिक संचिताचा ऐवज नष्ट होतो. विशेष करून सध्याच्या पिढीला बोली भाषा व मातृभाषांचे संवर्धन करण्याची गरज आहे. एखाद्या देशाची संस्कृती व चिंतन याचा एकत्रित आविष्कार म्हणजे ती भाषा असते. मात्र इंग्रजी सारख्या भाषांचे आक्रमण भारतीय भाषांवर होऊन त्या आक्रसत चालल्या आहेत. त्यासोबतच भारतात असलेल्या अनेक बोलीभाषा व त्या भाषांमधून प्रकट होणारे सांस्कृतिक संचित आपण जपले पाहिजे असे डॉ गणेश देवी म्हणाले. पूर्वी एखाद्या पिढीचे सांस्कृतिक संचित हे ग्रंथालय व संस्थात्मक पायाभरणी यातून पुढच्या पिढीत हस्तांतरित होत होते. मात्र स्मृती साठवण्याचे महत्त्वाचे कार्य आपण कंप्यूटर व मशीनला दिले आहे. त्यामुळे भाषा विरहित समाजाची निर्मिती होईल की काय असा धोका त्यांनी व्यक्त केला.

भारतीय सिद्धांत व पाश्चात्य विचार परंपरा यांचा साकल्याने अभ्यास करून तौलनिक अभ्यास करण्याची गरज डॉ. गणेश देवी यांनी व्यक्त केली. भाषा साहित्य व मानव्यविद्या शाखांमध्ये होणारे संशोधन हे या दर्जाचे असावे असे ते म्हणाले. व्यक्तीने कुठल्या एका भाषेचा अभिनिवेश न ठेवता अधिकाधिक भाषा अवगत करण्यासाठी धडपड केली पाहिजे. कारण प्रत्येक नवी भाषा हा एक नवी सांस्कृतिक अवकाश दाखवणारा महत्त्वाचा बिंदू असतो. आपले चित्त व सभोवताली असलेल्या विश्वाला जोडणारा एकमेव सेतू म्हणजे भाषा आहे असे महत्त्वाचे विधान डॉ. गणेश देवी यांनी केले. सभोवतालच्या परिस्थितीची उकल आपणास भाषेच्या माध्यमातून होते. त्यामुळे भाषेचे संवर्धन होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मातृभाषेत दिलेले शिक्षण हे अधिक परिणामकारक असते व व त्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो असे डॉ. देवी म्हणाले.

या व्याख्यानमालेचे संयोजन वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन विभागाचे समन्वयक डॉ. महेश पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रशांत पुरुषोत्तम धर्माधिकारी यांनी केले. तसेच तांत्रिक सहाय्य प्रा. प्राची नितनवरे व प्रा. मानसी जंगम यांनी केले. हा कार्यक्रम ऑनलाइन आयोजित करण्यात आला. तसेच याचे थेट प्रक्षेपण फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून करण्यात आले. या व्याख्यानास विद्यार्थी संशोधक व प्राध्यापकांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

---

चिंता पाहुणा म्हणून येते आणि लवकरच मालक बनून राहते!

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

**‘व्ही. पी. एम. पॉलिटेक्निक लॉकडाऊनच्या कालावधीतील उपक्रम’**

‘कोविड-१९’ च्या प्रार्दुभावामुळे व्ही. पी. एम. पॉलिटेक्निकचे शिक्षक व विद्यार्थी लॉकडाऊन कालावधीत विविध उपक्रमात सहभागी झाले. हा उपक्रम ‘ऑनलाईन प्लॅटफॉर्म’वर घेण्यात आला.

संस्थेच्या शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी अनेक ऑनलाईन क्विझमध्ये सहभाग घेतला. शिक्षकांनी विविध वेबिनार व FDP (फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम) मध्ये सहभाग घेतला. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या अभ्यासाला अनुसरून तयार केलेल्या विविध प्रश्नमंजुषांमध्ये सहभाग घेऊन ते सर्टिफिकेटला पात्र ठरले. व्ही. पी. एम. पॉलिटेक्निकच्या इन्व्होव्हेशन सेल तर्फे विद्यार्थ्यांसाठी 'Status' व त्यासाठी लागणारे विविध सॉफ्ट स्कील व विविध पर्याय या विषयी नावाजलेल्या व निष्णात अशा व्यक्तींकडून विद्यार्थ्यांना वेबिनार मधून मार्गदर्शन मिळाले. व्ही. पी. एम. पॉलिटेक्निकच्या इलेक्ट्रीकल पावर सिस्टीम, इन्स्ट्रुमेंन्टेशन, कॉम्प्युटर इंजिनिअरच्या शाखेने राज्यस्तरीय ऑनलाईन क्विझ आयोजित केली होती.

१) इलेक्ट्रीकल इंजिनिअरींगच्या शाखेने "Basics of Electrical Engineering" या विषयावर प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी १ जून ते ६ जून २०२० पर्यंत ऑनलाईन प्रश्नमंजुषा आयोजित केली होती. ४८५ विद्यार्थ्यांनी या प्रश्नमंजुषेत सहभाग घेतला होता. राज्यातील २५ पॉलिटेक्निक व इंजिनिअरींग कॉलेजने यात सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांना ऑनलाईन सर्टिफिकेटने सन्मानित करण्यात आले.

२) कॉम्प्युटर इंजिनिअरींगच्या शाखेने (२५ मे २०२० ते १ जून २०२०) च्या दरम्यान "Test your skill of Digital Techniques" या विषयावर प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी online quiz आयोजित केली होती. ५३४ विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला. ४८४ विद्यार्थी सर्टिफिकेटसाठी पात्र ठरले.

३) इन्स्ट्रुमेन्टेशन इंजिनिअरींगच्या शाखेने २८ मे २०२० रोजी इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रोनिक्स, मेकॅनिकल, केमिकल व इतर इंजिनिअरींग शाखेसाठी "Basics of Industrial Transducers" या विषयावर online प्रश्नमंजुषा आयोजित केली होती. ५६७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता व त्यापैकी ४७२ विद्यार्थी सर्टिफिकेटससाठी पात्र झाले.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**मे - २०२० मधील कार्यक्रम / वार्ता**

१ मे - २१ मे : डॉ. नीतिन जोशी, डॉ. स्मिता जपे, डॉ. अर्लोफ जॉन व्हिएरा, प्रा. कंचन अक्षय आणि प्रा. कृणाल पुंजानी यांनी आयआयसी, एमएचआरडी आणि एआयसीटीईतर्फे आयोजित १३ सत्रात भाग घेतला. या सत्रांमध्ये मुख्यत्वे नावीन्य, स्टार्टअप, उद्योजकता आणि पेटंट यावर लक्ष केंद्रित केले गेले होते.

१ मे - २ मे : प्रा. कंचन अक्षय २ दिवसांच्या ‘करिअर कोचिंग बाय माइंडलर’ या प्राध्यापक विकास कार्यक्रमास उपस्थित राहिल्या .

२ मे : डॉ. स्मिता जपे यांनी डॉ. व्ही. एन. ब्रीम्स साठी ‘भांडवल गुंतवणुकीचे निर्णय : एखाद्या कंपनीत गुंतवणुकीच्या प्रस्तावाचे मूल्यांकन करण्याचे प्रकरण’ या विषयावर एक केस स्टडी लिहिली.

२ मे : प्रा. कृणाल के. पुंजानी, एआयसीटीई तर्फे आयोजित ऑनलाईन लीडरशिप टॉक विथ लेफ्टनंट जनरल डॉ. माधुरी कानिटकर या कार्यक्रमास उपस्थित राहिले.

२ ते १८ मे : प्रा संदीप मोघे जीएचआरडब्ल्यूएस – ग्लोबल ह्युमन रिसर्च वेलफेयर सोसायटी तर्फे आयोजित शारीरिक शिक्षण व संशोधन विषयक ऑनलाईन आंतरराष्ट्रीय कार्यशाळेत सहभागी झाले.




२ मे : मुंबई विद्यापीठ व लाला लजपतराय महाविद्यालयाच्या वतीने आयोजित 'ऑनलाइन कॉलेज व्यवस्थापन व ऑनलाईन सामग्री निर्मिती साधने' या विषयावरील ३ दिवसीय राष्ट्रीय स्तरावरील प्राध्यापक विकास कार्यक्रमात प्रा. कृणाल के. पुंजानी सहभागी झाले.

४ मे : हैदराबाद विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या, 'एन्ड नोट फॉर रेफरन्स मॅनेजमेंट' या विषयावरील वेबिनारला प्रा. कुणाल के. पुंजानी उपस्थित राहिले.

४ मे : मॅकग्रॅ–हिल प्रकाशनातर्फे आयोजित, 'लिव्हरेजिंग एज्युकेशन थ्रू टेक्नॉलॉजी' या विषयावरील वेबिनारला डॉ. स्मिता जपे उपस्थित राहिल्या.

५ मे : डॉ. मीनाक्षी मल्होत्रा यांनी सुयश पाटील, पूर्वा अजगावकर, सयाली पालव आणि रेवती या विद्यार्थ्यांसह, डॉ. व्ही. एन. ब्रीम्सच्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन गायन व भित्तीचित्र स्पर्धा आयोजित केली. जवळपास १८ विद्यार्थ्यांनी यात भाग घेतला. एमएमएस प्रथम वर्षाचे विद्यार्थी जय नांगरे आणि सीमा यांनी कार्यक्रमाचे सूत्र संचालन केले.




५ मे : डॉ. अरलोफ जॉन व्हीएरा 'कोविड १९ मधील इमर्जिंग जॉब्स अँड ट्रेंड' या विषयावरील वेबिनारला उपस्थित राहिले.

६ मे : डॉ. नीतिन जोशी 'प्रोग्राम ऑन सर्टिफाईड हॅप्पीनेस प्रॅक्टिशनर लेव्हल' या अभ्यासक्रमात / कार्यक्रमात सहभागी झाले आणि २८ मे २०२० रोजी त्यांनी हा अभ्यासक्रम / कार्यक्रम पूर्ण केला.

७ मे : प्रचलन (ऑपरेशन्स) विषयाचे प्राध्यापक, डॉ. आर्लोफ जॉन व्हिएरा, प्रा. महेश भानुशाली आणि प्रा. विभूती सावे यांनी, 'पुरवठा साखळीच्या पुनरुज्जीवन आणि नूतनीकरण भूमिकांवर' या विषयावरील वेबिनारचे यशस्वीरित्या आयोजन केले. प्रा. डॉ. अर्लोफ जॉन व्हिएरा आणि प्रा. महेश भानुशाली या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते होते. प्रा. विभूती सावे यांनी वेबिनारचे यशस्वीरित्या संचालन केले. प्रा.संदीप मोघे आणि आयटी विभागाने तांत्रिक सहकार्य केले. वेबिनारमध्ये १०० हून अधिक सहभागींनी हजेरी लावली. सहभागींनी वेबिनारचा मजकूर, वितरण आणि परस्पर संवादांचे कौतुक केले.



७ मे : मुंबई बी ई चॅप्टरचा भाग म्हणून सीआयआय (भारतीय उद्योग महासंघ) यांनी आयोजित केलेल्या रुडॉल्फ डी सौझा यांच्या 'ज्ञान व्यवस्थापनावरील सत्राला' डॉ. नीतिन जोशी उपस्थित राहिले.

८ मे : डॉ. स्मिता जपे आणि प्रा. दीप्ती पेरिवाल यांनी 'बुलोज पेंट्स'साठी, 'अंडरस्टॅण्डिंग इन्कम स्टेटमेंट फॉर डिसिजन मेकिंग' या विषयावर वेबिनार आयोजित केले. प्रा. संदीप मोघे आणि आयटी विभागाने तांत्रिक सहकार्य केले.




११ मे : एलेट्स टेक्नोमेडिया तर्फे आयोजित 'डिस्ट्रपटिव्ह युनिव्हर्सिटी' या विषयावरील वेबिनारला डॉ. अरलोफ जॉन व्हिएरा उपस्थित राहिले.

११ मे : मुंबई विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षक संघाच्या वतीने आयोजित आधुनिक शिक्षणात चाणक्य-नीतीचे उपयोजन या विषयावरील वेबिनारला प्रा. कृणाल के. पुंजानी उपस्थित राहिले.

१२ मे - १६ मे : प्रा. कंचन अक्षय आणि डॉ. अर्लोफ जॉन व्हिएरा यांनी 'ऑनलाईन सॉफ्ट स्किल प्रशिक्षण कार्यक्रमा'च्या द्वितीय तुकडीचे आयोजन केले.

१३ मे : डॉ.स्मिता जपे आणि श्वेता नायर यांनी माजी विद्यार्थी बैठक आयोजित केली. यात ब्रीम्सची माजी विद्यार्थी संघटना - 'मर्मबंध' च्या सदस्यांनी हजेरी लावली. माजी विद्यार्थ्यांनी ब्रीम्सच्या विद्यार्थ्यांना भूमी वर्ल्ड, पैसा वासुल आणि शेअर खान येथे इंटर्नशिपच्या संधी उपलब्ध करून दिल्या.




१३ मे : मुंबई विद्यापीठातर्फे आयोजित ''रॉड मॅप ऑन सेटिंग अप ऍन एफफे क्टिव्ह इंडस्ट्री अकॅडेमिया कोलॅबोरेशन'' या विषयावरील वेबिनारला प्रा. महेश भानुशाली ब्रीम्सचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहिले.




१४ मे : प्रा. कृणाल के. पुंजानी, प्रा. विभूती सावे आणि वैभव पंडित यांनी 'एम ओ ओ सी आणि ऑनलाईन सत्रांसाठी प्रभावी आणि खिळवून ठेवणारे व्हिडिओ विकसित करणे' या विषयावरील - एका ऑनलाइन कार्यशाळेचे आयोजन केले. यात ९० हून अधिक सहभागींनी हजेरी लावली होती. प्रा. संदीप मोघे आणि आयटी विभागाने तांत्रिक सहकार्य केले.

१४ मे : डॉ. अर्लोफ जॉन व्हिएरा, एल्सेव्हियर तर्फे आयोजित 'रिसर्च वर्कफ्लोज, रिसर्च मॅट्रिक्स अँड एक्सलन्स इन अकॅडेमिक इन्स्टिटयूशनस' या विषयावरील वेबिनारला उपस्थित राहिले.

१४ मे : ब्रीम्सच्या नियुक्ती विभागाने ४ एच आर विद्यार्थ्यांना 'अप्रायजल कन्सल्टन्सी' मध्ये उन्हाळी रोजगार मिळवून दिला.

१४ मे : प्रा. कृणाल के. पुंजानी, एआयसीटीई आणि

एल्सेव्हिएर तर्फे आयोजित 'रिसर्च वर्कफ्लो आणि रिसर्च मेट्रिक्स' विषयावर आयोजित वेबिनारला उपस्थित राहिले.

१५ मे : डॉ. स्मिता जपे, इनोव्हेशन रिस्क डायग्नोस्टिक–प्रॉडक्ट इनोव्हेशन रुब्रीक (पीआयआर)च्या सत्राला उपस्थित राहिल्या.

१६ मे : डॉ. अरलोफ जॉन व्हिएरा, 'डिक्लटर युअर मेंटल अँड फिसिकल वर्ल्ड' या विषयावरील वेबिनारला उपस्थित राहिले.

१८ मे : प्रा. महेश भानुशाली यांनी व्हर्च्युअल इंटर्नशिपसाठी 'टाटा टेलि सर्व्हिसेस' या नामांकित कंपनीत पहिल्या वर्षाच्या चार विद्यार्थ्यांना काम मिळवून दिले.

१८ मे : सीएचएम महाविद्यालया तर्फे आयोजित आयक्यूएसीवर आधारित सत्रास डॉ. नीतिन जोशी उपस्थित राहिले.

१८ ते १९ मे : प्रा. महेश भानुशाली आणि नियुक्ती विभागाच्या सदस्यांनी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांची (२०१९–२०) ऑनलाईन योग्यता/मूल्यांकन चाचणी घेतली.

१८ – २२ मे : डॉ स्मिता जपे, डॉ. मीनाक्षी मल्होत्रा, प्रा. कृणाल के. पुंजानी आणि प्रा. महेश भानुशाली यांनी, 'हाऊ टू पब्लिश रिसर्च पेपर इन स्कोपस इंडेक्स जर्नल :- अ स्टेप बाय स्टेप अप्रोच' या विषयावरील ५ दिवसांच्या ऑनलाईन प्राध्यापक विकास कार्यक्रमाच्या पहिल्या तुकडीची रचना करून त्याचे यशस्वीरित्या आयोजन केले. यात ७० हून अधिक जण सहभागी झाले.




१९ मे : डॉ. अर्लोफ जॉन व्हीएरा, ईक्यू मॅग तर्फे आयोजित 'री–कोविड – कि कन्सिडरेशनस अँड चॅलेंजेस कन्फर्मेशन' आणि 'एआयएमए आयोजित रीथकिंग अँड स्टार्ट अप इकॉनॉमी इन पोस्ट कोविड वर्ल्ड' विषयावरील वेबिनारला उपस्थित राहिले.

२० मे : डॉ. अरलोफ जॉन व्हिएरा आयआयएमएम तर्फे आयोजित 'सप्लाय चेन प्रायॉरिटीस फॉर अर्ली रिव्हाइवल – स्ट्रेंथनींग द वीक लिंक्स' या विषयावरील वेबिनारला उपस्थित राहिले.

२० मे : प्रा. विभूती सावे यांनी 'मॅकमास्टर युनिव्हर्सिटी आणि कॅलिफोर्निया विद्यापीठ सॅन डिएगो' तर्फे मान्यताप्राप्त आणि कोर्सेरा तर्फे आयोजित 'लर्निंग हाऊ टू लर्न : पॉवरफुल मेंटल टूल्स टू हेल्प यू मास्टर टफ सब्जेक्टस' हा अभ्यासक्रम पूर्ण केला.

२० मे : कल्याणच्या बिर्ला महाविद्यालयातर्फे आयोजित 'ट्रेनिंग ऑन रुसा (RUSA) वेब बेसड सॉफ्टवेअर ॲप्लिकेशन' या विषयावरील प्रशिक्षण घेण्यासाठी प्रा. संदीप मोघे वेबिनारला उपस्थित राहिले.

२०–२३ मे : वैभव पंडित आणि सौ. दीप्ती गोखले, आय क्यू ए सी क्लस्टर इंडिया आणि व्हाईट कोड तर्फे आयोजित 'रोल ऑफ नॉन –टिचिंग स्टाफ इन ॲक्रिडिएशन अँड क्वालिटी एन्हान्समेंट ऑफ हायर एज्युकेशन इन्स्टिट्यूशन्स' या विषयावरील वेबिनारला उपस्थित राहिले.




२१ मे : डॉ. नीतिन जोशी हे विजय सोनवणे यांच्या करिअर मार्गदर्शन वेबिनारला उपस्थित राहिले.

२२ मे : डॉ. अरलोफ जॉन व्हिएरा, एआयएमएच्या वतीने आयोजित'' कोविड इम्पॅक्ट : रिव्हाइवल स्ट्रॅटेजिस फॉर पोस्टमॅन्डिक फेज'' विषयावरील वेबिनारला उपस्थित राहिले.

२३ मे : बांदोडकर महाविद्यालय, ठाणे तर्फे आयोजित इन्क्विस्टीव्ह माइंड-गूगल स्कॉलर' या विषयावरील वेबिनारला डॉ. अर्लोफ जॉन व्हीएरा उपस्थित राहिले.

२३ मे : प्रा. दीप्ती पेरिवाल यांनी नवोदितांसाठी ''ट्रेड इन स्टॉक मार्केटस फॉर बिगिनर्स'' या विषयावर वेबिनार आयोजित केले. प्रा. संदीप मोघे आणि आयटी विभागाने तांत्रिक सहकार्य केले.




२३ मे : डॉ. पल्लवी चांदवसकर यांनी आय.सी.ए.सी. च्या वतीने डॉ. व्ही.एन. ब्रीम्सतर्फे 'लिव्हरेजिंग टेक्नॉलॉजी टू कॉम्बॅट मार्केटिंग चॅलेंजेस इन द करंट पॅनडॅमिक सिनॅरिओ' या विषयावर प्रा. कला महादेवन आणि कृष्णन सुब्रमण्यम या अतिथी वक्त्यांसह वेबिनार आयोजित केला. प्रा. संदीप मोघे आणि आयटी विभागाने तांत्रिक सहकार्य केले.

२३ मे : राजीव गांधी कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स अँड सायन्स वाशी, नवी मुंबई, यांच्या वतीने आयोजित ''मेकिंग ई-लेक्चर व्हायब्रंट अँड इंटरएक्टिव्ह'' विषयावरील एक दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेला प्रा. विभूती सावे उपस्थित राहिल्या.

२४ मे : एआयएमएस तर्फे आयोजित एआयसीटीईच्या अध्यक्षांनी सादर केलेल्या, तसेच सोनिया यांच्या 'बाउन्सिंग बॅक' वेबिनारला डॉ. नीतिन जोशी उपस्थित राहिले.

२५-२९ मे : प्रा. विभूती सावे यांनी, 'आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग युसिंग पायथॉन' या विषयावरील ५ दिवस 'इन्स्ट्रक्टर लेड लाइव्ह ऑनलाईन प्राध्यापक विकास कार्यक्रमा' मध्ये भाग घेतला.

२५ मे : डॉ. अरलोफ जॉन व्हिएरा एलेन्स टेक्नोमेडिया तर्फे आयोजित ''देअर इज सो मच टू लाईफ दॅ फॉलोईंग अदर्स प्रिस्क्राइबड फुटस्टेप्स्'' या विषयावरील वेबिनारला उपस्थित राहिले.

२५ मे : डॉ. नीतिन जोशी हे ब्रायन ट्रेसी यांच्या सत्रास उपस्थित राहिले.

२६ मे : डॉ. नीतिन जोशी हे डॉ. लकी कासट यांच्या प्रेरणात्मक भाषणाला उपस्थित राहिले.

२६ मे: क्रीडा समितीच्या वतीने ब्रीम्सच्या विद्यार्थी व कर्मचाऱ्यांसाठी फिटनेस चॅलेंज आयोजित करण्यात आले.

२६ - ३० मे : डॉ. स्मिता जपे, डॉ. मीनाक्षी मल्होत्रा, प्रा. कृणाल के. पुंजानी आणि प्रा. महेश भानुशाली यांनी ''हाऊ टू पब्लिश रिसर्च पेपर इन स्कोपस इंडेक्स जर्नल :- अ स्टेप बाय स्टेप अप्रोच''




या विषयावरील ५ दिवसांच्या ऑनलाईन प्राध्यापक विकास कार्यक्रमाच्या दुसऱ्या तुकडीचे यशस्वीरित्या आयोजन केले. यात देखील ७० हून अधिक जण सहभागी झाले.

२७ मे : डॉ. अर्लोफ जॉन व्हिएरा, राईट सिलेक्शन / एल स्ट्रॅटेजिक तर्फे आयोजित ''चॅलेंजेस ऑफ एंटरप्रेनिरशिप अँड इनोव्हेशन इन कोविड इरा'' या विषयावरील वेबिनारला उपस्थित राहिले.

२७ मे : डॉ. नीतिन जोशी यांनी ''सिम्पल आर्ट ऑफ गोल सेटिंग'' हा लेख प्रसिद्ध केला.

२७ मे : डॉ. नीतिन जोशी, विषयावरील टीसीएस तर्फे आयोजित 'फिनान्सिंग फॉर एसएमई अँड एमएसएमई' या वेबिनारला उपस्थित राहिले.

२८ मे : डॉ. अरलोफ जॉन व्हिएरा पुढील वेबिनारला उपस्थित राहिले.

- इनपॉड्स तर्फे आयोजित ''ॲक्रिडिटेशन मॅनेजमेंट सिस्टम–डेमो''
- राईट सिलेक्शन / एल स्ट्रॅटेजिक तर्फे ''विथ होप, ऑडासीटी अँड रेसिलिअन्स वुई शाल सक्सीड''
- इनपॉड्स तर्फे आयोजित ''ॲक्रिडिटेशन मॅनेजमेंट सिस्टम फॉर हेल्थ केअर इन्स्टिट्युशन''
- एआयएमए तर्फे आयोजित ''रिऑर्गनाइजिंग बिझनेस ड्युरिंग कोविड क्रायसीस''

२८ मे : डॉ. डी. वाय. पाटील यांच्या तर्फे आयोजित, शिव खेरा यांच्या वेबिनारला डॉ. नीतिन जोशी उपस्थित राहिले.

२९–३१ मे : एमिटी विद्यापीठा तर्फे आयोजित 'मूडल एलएमएस' वरील प्राध्यापक विकास कार्यक्रमाला डॉ. अर्लोफ जॉन व्हिएरा उपस्थित राहिले.

२९ मे : प्रा. महेश भानुशाली यांनी अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी eClerx कंपनीमध्ये आर्थिक विश्लेषक पदाची संधी आणली. ऑनलाईन परीक्षेत एमएमएस आणि पीजीडीएमच्या ३२ उमेदवारांनी भाग घेतला. त्यापैकी १० विद्यार्थ्यांची जून २०२० च्या पहिल्या आठवड्यात नियोजित मुलाखतींच्या स्काईप फेरीसाठी निवड झाली.




३० – ३१ मे : डॉ. व्ही एन ब्रीम्स तर्फे ''आर्ट ऑफ सेलिंग'' या विषयावर वेबिनार आयोजित करण्यात आला.

दीपक रेडगावकर हे वेबिनारचे प्रमुख वक्ते होते आणि वेबिनारचे संचालन प्रा. कंचन अक्षय यांनी केले. प्रा. संदीप मोघे आणि आयटी विभागाने तांत्रिक सहकार्य केले.

डॉ. नीतिन जोशी यांनी 'प्रेरणा' या विषयावर २० व्हिडिओची मालिका तयार केली आणि अपलोड केली.

प्रा. कृणाल के पुंजानी, डॉ. स्मिता जपे, डॉ. मीनाक्षी मल्होत्रा, प्रा. महेश भानुशाली, प्रा. विभूती सावे आणि प्रा. संदीप मोघे या ब्रीम्सच्या आयआयसी टीमने 'इनोबिझ' – इनोव्हेशन स्पर्धा आयोजित करण्यासाठी मेंटर्स सह संयोजन केले. त्यांच्या सोल्यूशन नोट्स आणि सर्व संघांचे मूल्यांकन करण्यासाठी वरिष्ठ परीक्षक गटाशी समन्वय साधला.

प्रो. अर्लोफ जॉन व्हिएरा यांनी ऑनलाईन सप्लाय चेन मॉड्यूलर कोर्स (पीपी मॉड्यूल, पीआयएम मॉड्यूल, एलएम मॉड्यूल) आणि ४ थे जॉब लर्निंग मॉड्यूल डिझाइन केले. त्यांनी प्रत्येक मॉड्यूलसाठी अभ्यासक्रम आणि अंतिम मूल्यांकन यासह कार्यक्रमाच्या वितरणाची माहिती दिली.

●●●

(पृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय)**

ग्रहगणित समजावून घेण्याचा प्रयत्न केला. त्यांचे हे अनुभवही त्यांनी लिहून ठेवले आहेत. एके ठिकाणी ते म्हणतात,

They did their astronomical calculations with swiftness and remarkable ease, without pen and pencil; their only accessories were cauries (kind of shells) which they arranged on a table, like our chips, and more often than not on the ground. This method of calculation appears to me to be more advantageous, in that it is faster and more expeditious than ours.

सूर्य किंवा चंद्रग्रहणांना हिंदूंच्या जीवनशैलीमध्ये फार महत्त्वाचे स्थान होते. त्यांचे अचूक भाकीत ग्रहगणिताच्या आधारावर ज्योतिषी करत. ल जेंटील यांच्या लिखाणामुळे पाश्चात्य जगतामध्ये हिंदूंच्या गणिताबद्दल प्रचंड उत्सुकता निर्माण झाली.

जीन बेली (Jean Sylvain Bailly, १७३६ ते १७९३) हे तिसरे महत्त्वाचे फ्रेंच गणिती की ज्यांच्यामुळे हिंदूगणिताच्या संशोधनाला पाश्चात्य जगतामध्ये मोठी मान्यता मिळाली. ग्रहगणिताच्या इतिहासावर त्यांनी चार खंड लिहिले आहेत. कॅसिनी, आणि जेंटील यांच्या भारतीय गणिताच्या संशोधनाचा परामर्श तर त्यांनी घेतलाच, पण पॅरिसच्या ग्रंथालयात पडून असलेल्या गणितांच्या संस्कृत हस्तलिखितांचा अभ्यासही त्यांनी चालू केला. 'पंचांग शिरोमणी' हे असेच एक हस्तलिखित, की ज्यावर त्यांनी संशोधन करून ठेवले आहे. इंग्लंडहून प्रसिद्ध होणाऱ्या Transactions of the Royal Society of Edinburgh आणि कलकत्त्याहून प्रसारित होणारे Asiatic researches या नामांकित संशोधनपत्रिकांमधून १७९० च्या सुमाराला हिंदू गणितशास्त्रावर त्यांनी काही महत्त्वाचे निबंध प्रकाशित केले. त्यांच्या निबंधांमुळेही पाश्चात्यांमध्ये हिंदूगणित शिकण्याची इच्छा प्रबळ होत गेली.

आर्यभट, ब्रह्मगुप्तापासून भास्कराचार्यांच्या संस्कृतमधील गणिताच्या पोथ्या या पॅरिस आणि लंडनच्या ग्रंथालयात येऊन पोहोचल्या होत्या. फ्रेंच, जर्मन आणि पुढे इंग्लिश गणिती याकरिता संस्कृत शिकायला लागले, आणि त्यांनी झपाटल्यासारखे या विषयांत संशोधन करायला सुरुवात केली. एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांमध्ये या भाषांतराच्या कामाने आणखीन वेग घेतला.

विज्ञानाप्रमाणे धर्म आणि तात्त्विक विचारांमध्येही जे बदल होत होते त्यातून अनेक नवीन वैचारिक प्रवाहही निर्माण होत होते. सौंदर्यवाद, गूढवाद, रोमांचवाद आणि यात सर्वात महत्त्वाचा 'स्वच्छंदतावाद' (Romanticism) यांची सुरुवात साधारणपणे अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात झाल्याचे समजले जाते. या विचारधारेमध्ये व्यक्तिस्वातंत्र्य आणि सर्जनाच्या सादरीकरणामध्ये परंपरागत नियम, मूल्य, आखणी या गोष्टी नाकारल्या गेल्या. कला, साहित्य, शिल्प, संगीत या सगळ्या क्षेत्रांमध्ये स्वच्छंदतावादाचा प्रभाव हा युरोपमधील इंग्लंड प्रमाणेच फ्रान्स, जर्मनी आणि इतर सर्व देशांच्या शिल्प, संगीत, कला, साहित्य इ. निर्मितीमध्येही दिसून येतो.

प्रबोधनयुगाची सुरुवात हीच वसाहतवादाचीही सुरुवात होती.

साहाजिकच यातून एक श्रेष्ठत्व, वंशवाद पोसला जात होता. विज्ञानात प्रगती होत असली तरी सृष्टी निर्मितीच्या बाबतीत अनेक वैज्ञानिकांवरही बायबलचा प्रभाव होता. साहाजिकच ग्रीक, लॅटिन भाषा किंवा सभ्यता, त्यांनी निर्माण केलेली कला आणि साहित्य यापेक्षा वेगळे काही जगात असू शकते यावर त्यांचा विश्वास बसत नव्हता. भारतामध्ये राज्य करायला लागल्यावर इंग्रजांचा संस्कृत भाषा आणि हिंदू तत्त्वज्ञानाशी संबंध येऊ लागला. प्रबोधन युगाच्या नवीन

शिकण्याच्या ऊर्मीमुळे ते हिंदूंच्या जीवनशैलीचा अधिकाधिक अभ्यास करायला लागले. यातच युरोपचे दुसरे प्रबोधन म्हणजे Oriental Renaissance ची सुरुवात होत होती. पहिल्या प्रबोधन युगाकरिता जशी ग्रीक भाषा आणि सभ्यता कारणीभूत होती, तशी या दुसऱ्या प्रबोधनाकरिता संस्कृत भाषा आणि हिंदू तत्त्वज्ञान कारणीभूत झाले.

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात विल्यम जोन्स यांनी कालिदासाच्या 'शाकुंतल'चे १७८९ मध्ये इंग्रजीमध्ये भाषांतर करून या क्रांतीला सुरवात केली. १७९४ मध्ये त्यांच्या 'मनुस्मृती'चे भाषांतर प्रकाशित झाले. ग्रीक, लॅटिन आणि संस्कृत भाषांमध्ये साधर्म्य असल्याचा सिद्धांतही त्यांनी मांडला. त्यांचे सहकारी चार्ल्स विल्किन्स (Charles Wilkins, १७४९ ते १८३६) यांनी भगवद्गीतेचे इंग्रजीमध्ये भाषांतर १७८५ मध्ये केले. त्यांचे दुसरे सहकारी हेन्री कुलब्रूक (Henry Colebrooke, १७६५ ते १८३७) यांनी भास्कराचार्यांचे गणितीग्रंथ आणि इतर संस्कृत ग्रंथांवर लिखाण केले. विल्यम जोन्स यांनी याचकरिता १७८४ मध्ये कलकत्त्याला एशियाटीक सोसायटीची (Asiatic Society) स्थापना केली. त्याची 'संशोधन-पत्रिका' Asiatic Researches यामधून संस्कृतमधील ग्रंथांचे चिकित्सक संशोधनपर लेख ते छापू लागले. या संशोधन पत्रिकेला युरोपमध्ये एवढी मागणी येऊ लागली की त्यांच्या काही आवृत्त्याही निघू लागल्या.

याचवेळी अब्राहम अँक्वेतील ड्युपेराँ (Abraham Anquetil Duperon, १७३१ ते १८०५) या फ्रेंच संशोधकाने १७७१ मध्ये 'अवेस्ता' या पारशी धर्मग्रंथाचे लॅटिनमध्ये भाषांतर केले. ड्युपेराँ यांनी भारतामध्ये प्रवास करून बरीच संस्कृत हस्तलिखिते मिळविली. औरंगजेबाचा भाऊ दाराशिको यांनी १६५७ मध्ये ५० उपनिषदांचे पर्शियन भाषेमध्ये भाषांतर केले होते. त्याचे ड्युपेराँ यांनी फ्रेंच आणि लॅटिन भाषेमध्ये भाषांतर केले. फ्रेंच भाषांतर हे कधीच प्रकाशित झाले नाही. परंतु त्यांचे उपनिषदांचे लॅटिन भाषांतर मात्र १८०१-०२ साली प्रकाशित झाले. हिंदूंच्या वैचारिक प्रगल्भतेची ओळख त्यामुळे पाश्चात्यांना झाली आणि त्यांची संस्कृत भाषा आणि हिंदूंचे तत्त्वज्ञान समजून घेण्याची भूक वाढायला लागली. पुढे शतकभरात उपनिषदांची भाषांतरे युरोपियन भाषांमध्ये होत राहिली. त्यांचा प्रभाव आर्थर शोपेनहायर (Arthur Schopenhauer, १७८८ ते १८६०), हेगेल (Georg Hegel, १७७० ते १८३१) ते ऐरविन श्रोडिंगर (Erwin Schrödinger, १८८७ ते १९६१) आणि अशा अनेक पाश्चिमात्य विचारवंत आणि वैज्ञानिकांवर पडला. जी गोष्ट उपनिषदांमुळे हिंदूंच्या तत्त्वज्ञानाची झाली, तशीच हिंदूंच्या साहित्यिक प्रतिभेची ओळख शाकुंतलच्या भाषांतरामुळे झाली.

विल्यम जोन्सचे शाकुंतलचे पहिले इंग्रजी भाषांतर १७८९ साली झाले. लगेचच त्याच्या आवृत्त्या निघू लागल्या. १७९० मध्ये लंडन, १७९६ साली एडींगबर्ग आणि १८०५ ला बोस्टन अशा पंधरा वर्षांत त्याच्या तीन आवृत्त्या निघाल्या. फोरस्टरने (Henry Pitts Forster, १७६६ ते १८१५) १७९१ साली त्याचे जर्मन भाषेमध्ये भाषांतर केले. ब्युगुइरे (burguiere) यांनी १८०३ मध्ये फ्रेंच भाषेत, तर दोरिया (Luigi Doria) यांनी १८१५ मध्ये इटालियन भाषेत भाषांतर केले. १७९२ मध्ये त्याचे रशियनमध्येही भाषांतर झाले होते. गटे (Johann Wolfgang Von Goethe, १७४९ ते १८३२) हे जर्मन कवी शाकुंतलमुळे प्रचंड प्रभावित झाले होते. Faust या त्यांच्या महाकाव्यामध्येही शाकुंतलचा प्रभाव दिसून येतो. पुढच्या २०० वर्षांत जगातल्या बहुतेक भाषांमधून शाकुंतलची भाषांतरे झाली आहेत.

एकोणिसाव्या शतकात मात्र संस्कृतच्या

अभ्यासाची तृष्णा इंग्लंडपेक्षा फ्रान्स आणि जर्मनीमध्ये वाढू लागली होती. विल्यम जोन्सचे एक समकालीन अलेक्झांडर हॅमिल्टन (Alexander Hamilton, १७६२ ते १८२४) हे भारतामध्ये बरीच वर्षे राहून संस्कृत शिकले होते. १८०३ मध्ये ते पॅरिसमध्ये होते. इंग्लिश आणि फ्रेंच लोकांच्या बिघडलेल्या संबंधांमुळे त्यांना अटक झाली. पॅरिसच्या ग्रंथालयांमध्ये त्यावेळेस बरीच संस्कृत हस्तलिखिते जमा झाली होती. त्यांची अनुक्रमणिका करण्याचे काम त्यांना मिळाले. त्याचवेळी जर्मनीमधून काही अभ्यासक संस्कृत शिकायला पॅरिसला आले. हॅमिल्टन यांनी पॅरिसमध्ये फ्रेंच आणि जर्मन अभ्यासकांना संस्कृत शिकविले. त्यातील बहुतेकांनी पुढे संस्कृतमधील संशोधनाचे महत्त्वाचे काम केले. फ्रेड्रिक शेगल (Friedrich Schlegel, १७७२ ते १८२९) हे त्यातीलच एक आघाडीचे संशोधक.

एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला संस्कृत भाषेच्या अभ्यासाचे केंद्र हे पॅरिस झाले. १८१५ साली युरोपमधील पहिले संस्कृतचे विद्यापीठीय अभ्यासकेंद्र हे पॅरिसला स्थापन होऊन लिओनार्ड चेझी (Lµonard de Chµzy) हे त्याचे पहिले प्राध्यापक झाले. संस्कृत भाषा आणि त्यामधील साहित्याच्या अभ्यासाचा वेग पॅरिसमध्ये इतका प्रचंड होता की, १८२१ साली Society Asiatique de Paris ही स्वातंत्र्य संस्था त्याकरिता काढण्यात आली. लंडनच्या Asiatic Society ची स्थापना २ वर्षांनंतर म्हणजे १८२३ मध्ये झाली. रशिया, जर्मनी, हॉलंड या सर्व देशांमधून अशा संस्थांची स्थापना झाली, आणि तेथे संस्कृत व भारतशास्त्राचा अभ्यास होऊ लागला. १८१८ साली बॉन (Bonn), आणि १८२१ मध्ये बर्लिन (Berlin) या जर्मनीमधील शहरांमध्येही संस्कृतचा विद्यापीठीय अभ्यास चालू झाला. त्याकरिता वेगळ्या प्राध्यापकांच्या नेमणूका होऊ लागल्या. एकोणिसाव्या शतकामध्ये सुमारे १० पेक्षा जास्त जर्मन विद्यापीठांमधून संस्कृतचा अभ्यास होत होता. याचाच परिणाम म्हणून विसाव्या शतकाच्या सुरुवातीला संस्कृत आणि भारतशास्त्राच्या अभ्यासाचे ४७ प्राध्यापक जर्मनीमध्ये होते. वेद, उपनिषद, पुराण, व्याकरणग्रंथ, साहित्य, काव्य ते अगदी स्थापत्याच्या संस्कृतमधील ग्रंथांची मोठ्या प्रमाणावर भाषांतरे जर्मन आणि फ्रेंच भाषेत झाली.

संस्कृतमधील या ज्ञानभांडाराची जेव्हा भाषांतरे होत होती तेव्हाच संस्कृत भाषा शिकण्याचाही पाश्चात्य कसोशीने प्रयत्न करीत होते. १८१० पर्यंत संस्कृतची चार व्याकरणे लंडनमध्ये प्रकाशित झाली. कुलब्रुक यांचे १८०५ साली, कॅरे (Carey) यांचे १८०६ साली, विल्किन्स (Wilkins) यांचे १८०८ साली आणि फोरस्टर (Forster) यांचे १८१० साली. या इंग्रजी भाषांतरांबरोबर जर्मन, फ्रेंच, डॅनिश या भाषांमधूनही संस्कृतची लहान-मोठी व्याकरणे प्रकाशित होत होती.

कोणत्याही संस्कृतीच्या विकासाचे प्रतिबिंब हे त्याच्या साहित्यामध्ये पडलेले असते. मानवी भावना आणि संवेदना व्यक्त करण्याकरिता भाषाही तेवढीच प्रगल्भ आणि लवचिक असावी लागते. समाजाच्या प्रगल्भतेचेही ते प्रतिबिंब असते. शाकुंतल या नाटकाची फक्त भाषाच प्रगल्भ होती असे नाही, तर त्यात व्यक्त झालेला शृंगारही तेवढाच सजग होता. शाकुंतलचे भाषांतर करताना पाश्चिमात्य सभ्यतेला तसा शृंगार पेलवत नव्हता म्हणून भाषांतर करताना त्यांनी तो सौम्य केला किंवा काही ठिकाणी तो काढूनही टाकला.

युरोपच्या दुसऱ्या प्रबोधनाला संस्कृतने दिलेले योगदान म्हणूनच महत्त्वाचे आहे.

सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे भारतीय संस्कृतीची जशी पाश्चात्यांना ओळख व्हायला लागली तसे त्यांचे श्रेष्ठत्व आणि वंशवादाचा अहंकारही डळमळू लागला.

पहिल्या प्रबोधनामुळे ग्रीक भाषा आणि संस्कृतीने पाश्चात्यांमध्ये आलेला साचेबंदपणा दूर करून जीवनाच्या सगळ्याच क्षेत्रांमध्ये एक वैचारिक क्रांती घडवून आणली. एकोणिसाव्या शतकातील संस्कृतच्या माध्यमातून आलेल्या दुसऱ्या प्रबोधनामुळे त्यांच्या विचारांमध्ये अधिक व्यापकता आली आणि त्यांचे काव्य, साहित्य, तत्त्वज्ञान, चित्र आणि शिल्प या कलांमधूनही सर्जनाचे एक पाऊल पुढे पडले.

या सगळ्याचा परामर्श घेणारा महत्त्वाचा ग्रंथ 'The Oriental Renaissance' रेमंड श्वाब (Raymond Schwab) यांनी फ्रेंच भाषेतून १९५० साली प्रकाशित केला. त्याचे इंग्रजी भाषांतर मात्र १९८४ साली अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठाने प्रकाशित केले. एडवर्ड सैद (Edward Said) यांची या ग्रंथाला अभ्यासपूर्ण प्रस्तावना आहे. १९७८ साली एडवर्ड सैद यांनी त्यांचा Orientalism हा ग्रंथ प्रकाशित केला. बोन्गार्ड लेविन (G. Bongard-Levin, १९३३ ते २००८) यांचे 'The Image of India' हे १९८४ साली प्रकाशित झालेले पुस्तक, संस्कृत आणि भारतीय संस्कृतीचा रशियावर पडलेल्या प्रभावाचे विस्तृत विश्लेषण करते. या तिन्ही ग्रंथांची चिकित्सा करणारे शेकडोंनी लेख, शोधनिबंध आणि स्वतंत्र पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

म्हणूनच दुसऱ्या प्रबोधनाला कारणीभूत झालेल्या संस्कृत भाषा, आणि त्यामधील साहित्य याचा पाश्चिमात्यांनी केलेल्या चिकित्सक संशोधनाचा परामर्श प्रत्येक भारतीयाने घेणे आवश्यक आहे. कदाचित भारतीय प्रबोधनाची बीजे त्यामध्ये असू शकतील.

**– डॉ. विजय बेडेकर**

## *विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर*



विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर,
ही माझी प्रार्थना नाही.
विपत्तीमध्ये मी भयभीत होऊ नये
एवढीच माझी इच्छा.
दु:खतापानं व्यथित झालेल्या माझ्या मनाचं
तू सांत्वन करावंस, अशी माझी अपेक्षा नाही
दु:खावर जय मिळवता यावा,
एवढीच माझी इच्छा.
माझ्या मदतीला कोणी न आल्यास
माझं बळ मोडून पडू नये एवढीच इच्छा.
जगात माझं नुकसान झालं,
केवळ फसवणूकच वाट्याला आली,
तर माझं मन खंबीर राहावं, एवढीच माझी इच्छा.
माझं तारण तू करावंस, मला तारावसं,
ही माझी प्रार्थना नाही.
तरून जाण्याचं सामर्थ्य माझ्यात असावं
एवढीच माझी इच्छा.
माझं ओझं हलकं करून
तू माझं सात्वन केलं नाहीस,
तरी माझी तक्रार नाही
ते ओझं वाहायाची शक्ती मात्र माझ्यात असावी,
एवढीच माझी इच्छा.
सुखाच्या दिवसात नतमस्तक होऊन
मी तुझा चेहरा ओळखावा
दु:खाच्या रात्री
सारं जग जेव्हा माझी फसवणूक करील
तेव्हा तुझ्याविषयी माझ्या मनात
शंका निर्माण होऊ नये,
एवढीच माझी इच्छा.

**– गुरुदेव रवींद्रनाथ टागोर**

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.